रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक १७७
www.ramprahar.com
रविवार, १२ जानेवारी २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

अंतरंग

'मविआ'त फूट; शिवसेना उबाठा स्वबळावर लढणार/३
'रविप्रहर'मध्ये विविध विषयांवरील लेख/४
आशियाई बॉक्सिंग स्पर्धेसाठी परी महाडिकची निवड/८

## भाजप प्रदेश कार्यकारी अध्यक्षपदी आमदार रवींद्र चव्हाण



**मुंबई** : भाजप महाराष्ट्र प्रदेश कार्यकारी अध्यक्षपदी आमदार रवींद्र चव्हाण यांची नियुक्ती राष्ट्रीय अध्यक्ष जगतप्रकाश नड्डा यांनी केली आहे. याबद्दल चव्हाण यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, भाजप अध्यक्ष नड्डा, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह सर्व वरिष्ठ नेत्यांचे आभार मानले आहेत. 'प्रथम, त्यानंतर पक्ष व शेवटी स्वतः हा भाजप परिवाराचा मंत्र मनात ठेवूनच आजवर राष्ट्रसेवेचा वसा जपत आलो आहे. पक्षाने ज्या ज्या जबाबदाऱ्या सोपवल्या त्यातील प्रत्येक जबाबदारी सर्वतोपरी यशस्वीरित्या पार पाडली. आज प्रदेश कार्यकारी अध्यक्षपदाची जबाबदारी माझ्यावर सोपवण्यात आली आहे. ती कोट्यवधी कार्यकर्त्यांच्या संघटन शक्तीच्या बळावर निष्ठापूर्वक पार पाडण्याचा प्रयत्न करेन, असे चव्हाण यांनी म्हटलेय.





नमो उत्सव
पतंग महोत्सव २०२५
मंगळवार दि.14 जानेवारी 2025 रोजी,
सायं 4 ते 7 वाजेपर्यंत.
▪KITE FLYING
▪LIVE MUSIC
▪SELFIE POINT
▪SPECIAL KITES FOR KIDS
श्री. प्रविण पाटील
अध्यक्ष-भारतीय जनता पार्टी खारघर शहर मंडळ
श्री. सुमित झुंजारराव
अध्यक्ष-भारतीय जनता युवा मोर्चा पनवेल शहर
1) ठिकाण- रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, सेक्टर 19, खारघर | 2) ठिकाण- एम.सी.सी.एच. सोसायटी मैदान पनवेल

रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक १७७
www.ramprahar.com
रविवार, १२ जानेवारी २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## रामलल्ला प्राणप्रतिष्ठा सोहळा वर्षपूर्ती उत्सवास प्रारंभ



**अयोध्या** : रामलल्लाच्या प्राणप्रतिष्ठेच्या वर्धापन दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. प्रतिष्ठा द्वादशी म्हणून साजरा केला जाणारा तीन दिवसांचा वर्धापन दिन सोहळ्यास शनिवार (दि. ११)पासून प्रारंभ झाला. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या हस्ते अभिषेक आणि महाआरतीने या उत्सवाला प्रारंभ झाला. गेल्या वर्षी २२ जानेवारी रोजी रामलल्ला भव्य आणि दिव्य मंदिरात विराजमान झाले होते. त्या वर्षीच्या शुभ मुहूर्तानुसार या वेळी प्रतिष्ठा द्वादशी सण शनिवारी साजरा केला गेला. यानिमित्ताने श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टने ११ ते १३ जानेवारीदरम्यान तीन दिवसांचा उत्सव साजरा करण्याची घोषणा केली आहे. अयोध्येतील शरयू घाटावर संध्या आरती करण्यात आली.

# महाविकास आघाडीत फूट

## शिवसेना उबाठा आगामी निवडणुका स्वबळावर लढणार

**नागपूर : प्रतिनिधी**

पुढील काही महिन्यांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर होण्याची शक्यता आहे. अशात शिवसेनेचे उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी मुंबईपासून ते नागपूरपर्यंत सर्व महापालिकेच्या निवडणुका आम्ही स्वबळावर लढवणार आहोत, अशी घोषणा शनिवारी (दि. ११) केली.

राज्यात नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचा महायुतीने धुव्वा उडवला होता. विधानसभेच्या अपयशानंतर आता महाविकास आघाडीतील अंतर्गत वाद चव्हाट्यावर यायला सुरुवात झाली आहे. गेल्या काही दिवसांपासून महाविकास आघाडीतील तिन्ही पक्षांचे नेते एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करत आहेत.



खासदार संजय राऊत यांनी नागपूर येथे प्रसारमाध्यमांशी बोलताना स्थानिक स्वराज्य संस्था स्वबळावर लढवणार असल्याचे म्हटले. ते म्हणाले, मुंबईपासून नागपूरपर्यंत आम्ही महापालिकेच्या निवडणुका स्वबळावर लढवणार आहोत. मग काय होईल ते होईल? एकदा आम्हाला आमची ताकद बघायचीच आहे. आम्ही महापालिकेच्या निवडणुका स्वबळावर लढणार आहोत. नागपूरलासुद्धा आम्ही स्वबळावर लढणार आहोत. उद्धव ठाकरे यांनी या संदर्भातील संकेत दिलेले आहेत. एकत्र लढलो तर कार्यकर्त्यांना संधी कधी मिळणार? कारण आघाडीत आणि विधानसभेत कार्यकर्त्यांना निवडणूक लढण्याची संधी मिळत नाही. त्याचा फटका पक्षाला आणि पक्षवाढीला बसत आहे. महानगरपालिका, जिल्हा परिषदा आणि नगरपंचायतीमध्ये निवडणुका स्वबळावर लढून आपापले पक्ष मजबूत करावे लागतात. त्यामुळेच आम्ही आगामी सर्व निवडणुका एकट्याने लढून ताकद आजमावणार आहोत, असेही राऊत या वेळी म्हणाले.

> *त्यांची इच्छा असेल स्वबळावर जायची तर त्यांना थांबवणारे आम्ही कोण? पण विधानसभेच्या पराभवानंतर आपण एकत्रित राहायला पाहिजे होते, असे माझे मत आहे. त्यामुळे हा निर्णय फार घाईने घेतलेला दिसतोय. ग्राऊंडवर कार्यकर्त्यांचे मत काय आहे हे आम्हाला माहितेय. त्यामुळे हा निर्णय योग्य आहे असे वाटत नाही. शेवटी बळेच कोणाला तरी घेऊन जाणे आम्हाला पटणारे नाही, पण त्यांच्यावर टीका करण्यात अर्थ नाही, कारण तो त्यांच्या पक्षाचा निर्णय आहे, मात्र आगामी पालिका निवडणुकीत याचा फटका १०० टक्के बसणार आहे.*
>
> **–आमदार जितेंद्र आव्हाड,** राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष

> *माझ्या विधानाला चुकीच्या पद्धतीने दाखवत दोनच नेते (नाना पटोले, संजय राऊत) जबाबदार असल्याचे दाखवले, पण विषय असा आहे की, संजय राऊत हे मोठे नेते असल्याने त्यांनी केलेले विधान हे त्यांच्या पक्षाची भूमिका असेल. तरीसुद्धा आम्ही एकदा उद्धव ठाकरे यांच्यासोबत चर्चा करू आणि त्यांना विनंती करू की आपण एकत्र लढू, मात्र जर ते सोबत नाही आले तर आम्हाला आमचा मार्ग मोकळा आहे. शरद पवार आणि आम्ही काँग्रेस आमची अनेक वर्षांची नैसर्गिक आघाडी राहिलेली आहे. त्यामुळे आम्ही दोघे आताही एकत्रित राहून पुढे जाण्याचा प्रयत्न करू.*
>
> **–आमदार विजय वडेट्टीवार,** काँग्रेस

## कोण पटकावणार बहुमानाचा अटल करंडक? उत्सुकता शिगेला

### विजेत्या एकांकिकेला एक लाख रुपये आणि मानाचा अटल करंडक मिळणार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



एकाहून एक अशा सरस अशा एकांकिका सादर होत असल्याने यंदाचा बहुमानाचा अटल करंडक कोण पटकावणार? याची उत्सुकता संपूर्ण महाराष्ट्राला लागली आहे. निमित्त आहे श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा व चांगू काना ठाकूर महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने पनवेलमध्ये सुरू असलेल्या ११व्या राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेचे.

या राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेच्या महाअंतिम फेरीचा पारितोषिक वितरण समारंभ रविवारी (दि. १२) सायंकाळी ७ वाजता स्पर्धास्थळ ठिकाणी अर्थात आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात होणार आहे. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या सोहळ्यात ज्येष्ठ रंगकर्मी सतीश पुळेकर यांचा गौरव रंगभूमीचा पुरस्काराने सन्मान करण्यात येणार आहे. या वेळी प्रमुख मान्यवर म्हणून पनवेल महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांची सन्माननीय; तर सुप्रसिद्ध अभिनेत्री सुकन्या मोने, सुप्रसिद्ध दिग्दर्शक देवेंद्र पेम, विराजस कुलकर्णी, सुप्रसिद्ध अभिनेता जयवंत वाडकर, सुप्रसिद्ध नाट्य निर्मात्या कल्पना कोठारी, अटल करंडक ब्रँड अँम्बेसिडर सुप्रसिद्ध अभिनेत्री रूचिरा जाधव, सुप्रसिद्ध अभिनेता भरत सावले यांची उपस्थिती असणार आहे.

या स्पर्धेला राज्यातील कलाकार व प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद लाभत असतो. त्यामुळे स्पर्धा राज्यात नावाजली असून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या स्पर्धकांना यंदाही भरघोस रकमेची पारितोषिके देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. या स्पर्धेचे प्रायोजक ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रा. लि., तर सहप्रायोजक नील ग्रुप आणि स्थळ प्रायोजक पनवेल महापालिका आहे.

शुक्रवारपासून सुरू झालेल्या राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेत राज्यातून निवड झालेल्या २५ एकांकिकांचे सादरीकरण होत आहेत. (पान ५ वर..)



### ज्येष्ठ रंगकर्मी सतीश पुळेकर यांचा गौरव रंगभूमीचा पुरस्काराने होणार सन्मान

## पेणमध्ये अल्पवयीन मुलाची हत्या करून मृतदेह झुडपात फेकला

**पेण : प्रतिनिधी**

पेण शहराजवळील फणसडोंगरी येथे राहणाऱ्या गणेश बाळू चुणारे (वय १४) या अल्पवयीन मुलाची अज्ञात आरोपीने हत्या करून मृतदेह झुडपात टाकून दिल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.

रायगड पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी गजानन टोम्पे यांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. या प्रकरणी पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सुरू आहे.

## पाली-खोपोली मार्गावर अज्ञात वाहनाची रिक्षाला धडक

### दोन जण जागीच ठार, एक गंभीर जखमी

**खोपोली, खालापूर, पाली : प्रतिनिधी**

पाली-खोपोली मार्गावर दुरशेत गावाजवळ शनिवारी (दि. ११) पहाटे ४च्या सुमारास अज्ञात वाहनाने रिक्षाला दिलेल्या जोरदार धडकेत दोन जणांचा जागीच मृत्यू, तर रिक्षाचालक गंभीर जखमी झाला आहे.





मयत रामदास ज्ञानेश्वर घोगरकर (वय २४) आणि अजित हरिश्चंद्र वाघमारे (वय २५, दोघेही रा. घोडपापड, जांभूळपाडा) कंपनीतून रात्रपाळी करून महेश खरात (रा. कळंब, ता सुधागड) यांच्या रिक्षाने (एमएच १४-जेपी ४८४०) कामावरून घरी चालले होते. ही रिक्षा पाली-खोपोली मार्गावर दुरशेत गावाजवळ आली असता अज्ञात वाहनाने तिला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात रामदास घोगरकर आणि अजित वाघमारे यांचा जागीच मृत्यू झाला असून रिक्षाचालक महेश खरात गंभीर जखमी झाला. दोन्ही मृतदेह खालापूर प्राथमिक आरोग्य केंद्रात पाठविण्यात आले असून जखमी रिक्षाचालकाला रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

दरम्यान, रामदास घोगरकर हा एकुलता एक मुलगा आहे, तर अजित वाघमारे यांची दोन लहान मुले आहेत. त्यांच्या नातेवाईकांनी सखोल तपासाची मागणी केली आहे. या अपघाताबाबत खालापूर पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## मृतदेह घेऊन जाणाऱ्या अॅम्ब्युलन्सचा अपघात; तीन जण गंभीर जखमी

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवरून अॅम्ब्युलन्समधून मृतदेह घेऊन जात असताना टायर फुटल्याने भीषण अपघात झाला. या अपघातात तीन जण गंभीर जखमी झाले आहेत.



बोलेरो टेम्पो अॅम्ब्युलन्समधून (एमएच ०५ आर ०६०८) चालक अशोक पटेल (वय २६, रा. भिवंडी, ठाणे) हा भरत बाबुराव पांचाळ यांचा मृतदेह घेऊन त्यांच्या नातेवाईकांसह सोलापूरमधील वळसंग येथे चालला होता. एक्स्प्रेस वेवर खालापूर हद्दीत पाठीमागील टायर फुटल्याने अॅम्ब्युलन्स उलटली. या अपघातात वैजनाथ निवृत्ती पांचाळ (वय ६०), रंजना वैजनाथ पांचाळ (वय ५०), अंतरा भरत पांचाळ (वय ११, सर्व रा. भिवंडी, ठाणे) गंभीर जखमी झाले. त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.




**पनवेल : श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवारी मंडळाच्या सभागृहात झाली. या सभेस मंडळाचे संस्थापक माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, उपाध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव परेश ठाकूर, खजिनदार भाऊशेठ पाटील, अनिल भगत, संजय भगत, डॉ. एस.टी. गडदे आदी उपस्थित होते.**




## जागतिक मराठी संमेलनाचे उद्घाटन; मान्यवरांची उपस्थिती

**सातारा : प्रतिनिधी**

जागतिक मराठी अकादमी आणि रयत शिक्षण संस्था यांच्या वतीने सातारा येथील छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये आयोजित 'शोध मराठी मनाचा' जागतिक संमेलनाचे उद्घाटन 'रयत'चे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या हस्ते व संमेलनाचे अध्यक्ष प्रसिद्ध विचारवंत डॉ. आ.ह. साळुंखे यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी (दि. १०) झाले.


उद्घाटन समारंभास मराठी भाषामंत्री उदय सामंत, सांस्कृतिकमंत्री आशिष शेलार, संस्थेचे चेअरमन व संमेलनाचे स्वागताध्यक्ष चंद्रकात दळवी, जागतिक मराठी अकादमीचे अध्यक्ष रामदास फुटाणे, कवी विठ्ठल वाघ, अभिनेते सयाजी शिंदे, उद्योजक हणमंत गायकवाड, ज्येष्ठ पत्रकार राजीव खांडेकर, 'रयत'चे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, माजी खासदार श्रीनिवास पाटील, यशवंतराव गडाख, दत्तप्रसाद दाभोलकर, आमदार विश्वजित कदम, डॉ. अनिल पाटील, कुलगुरू डॉ. ज्ञानदेव म्हस्के, माजी आमदार बाळासाहेब पाटील, नरेंद्र हेटे, कवयित्री सिसिलिया कार्व्हालो, नरेंद्र वाबळे, महेश म्हात्रे, अशोक पाटील, जयराज साळगावकर आदी मान्यवर उपस्थित होते.

आज २०वे जागतिक मराठी साहित्य संमेलन साताऱ्याच्या भूमीत होत आहे. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, कर्मवीर भाऊराव पाटील, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, यशवंतराव चव्हाण, किसन वीर, श्री.म. माटे, आ.ह. साळुंखे हे सर्व साताऱ्याचे. फक्त साहित्यच नाही; तर मराठी माणसाने उद्योग, कला, विचार, माहिती यांचे आदान-प्रदान करावे व ते साध्य होईल, असा विश्वास खासदार शरद पवार यांनी व्यक्त केला. अनेक उद्योजक यांनी शून्यातून उद्योग व्यवसाय उभे केले. त्यापैकी रामशेठ ठाकूर हे एक होत. या संमेलनासाठी त्यांनी २५ लाख रुपये मदत दिली आहे तसेच संस्थेला शंभर कोटींपेक्षा जास्त मदत केलेली आहे. कोणतीही अपेक्षा न ठेवता त्यांनी ही मदत केली, असे सांगत खासदार पवार यांनी त्यांचा गौरव केला. इतर मान्यवरांनीही विचार मांडले.

या वेळी भारत विकास ग्रुपचे उद्योजक हणमंत गायकवाड यांना जागतिक मराठी भूषण पुरस्कार आणि ज्येष्ठ पत्रकार राजीव खांडेकर यांना वि.वा चॅरिटेबल ट्रस्ट वसई यांचा जागतिक मराठी गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्नेहल दामले यांनी केले, तर आभार संस्थेचे सचिव विकास देशमुख यांनी मानले.




# 'कहो ना... प्यार है'ला पंचवीस वर्ष झालीदेखील!










झूम प्रहर



दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

अगदी कालपरवाची गोष्ट वाटते. मनोरंजन उपग्रह वाहिन्यांवर अवघ्या काही सेकंदाच्या एका तजेलदार नवीन टीझरने आपलं लक्ष वेधून घेतले होते. ते नवीन चेहरे होते हृतिक रोशन व अमिषा पटेल, तर चित्रपट 'कहो ना... प्यार है'. एका छोट्याशा म्युझिक पिसवरचा न्यूझीलंडच्या प्रसन्न समुद्र किनाऱ्यावरील या दोघांचे नवीन शैलीतील नृत्य... नवीन शतकातील प्रवेश करणारी युवा पिढी तर झालीच, पण मागील दशकातील म्हणजे ऐंशी नव्वदच्या दशकातीलही युवा पिढी या टीझरने भारी इम्प्रेस झाली.

कहो ना प्यार हैच्या आगमनाबाबत अतिशय तरुण आल्हाददायक वातावरण निर्माण झाले, तरी या चित्रपटाची आणि त्यातही हृतिक रोशनची क्रेझ निर्माण होईल असे कोणाला हो वाटले होते? राकेश रोशनचा चित्रपट दिग्दर्शनातील ग्राफ चढउताराचा असला तरी त्याने तरी या चित्रपटाच्या घवघवीत यशाची अपेक्षा कुठे हो ठेवली होती?

आणि आज पंचवीस वर्ष पूर्ण झाल्यावरही हा चित्रपट तितकाच फ्रेश आहे. त्यातील हृतिक रोशनची नवीन स्टाईलमधील नृत्य शैली आणि राजेश रोशनचे तरुण संगीत हेही तितकेच आज तारुण्यात आहे.

कहो ना... मुंबईत रिलीज १४ जानेवारी २०००. मेन थिएटर इरॉस. फर्स्ट शोपासूनच पिक्चर युवा रसिकांना आवडला आणि तरुणांना आवडलेले चित्रपट कायमच हाऊसफुल्ल गर्दीत एन्जॉय केले जातात हे तर अनेक वर्षांचे हुकमी समीकरण.

आजही हा चित्रपट 'जुना' अथवा मागील पिढीतील, इतकेच नव्हे तर सिंगल स्क्रीन थिएटर्सच्या काळातील म्हणूनही गणला जात नाही. (तोपर्यंत मल्टीप्लेक्स युगाला गती आली नव्हती.)

हा चित्रपट पडद्यावर आला रे आला आणि सगळं वातावरणच बदलून गेले. जणू वातावरण तारुण्याने चार्ज झाले. कहो ना... प्रदर्शित होईपर्यंत 'आल्सो चित्रपट' असं म्हटलं जाई. म्हणूनच म्हणतो, पिक्चर रिलीज झाल्यावरच तो हिट की फ्लॉप हे समजते नि तो हक्क तिकीट काढून येणाऱ्या पब्लिकचा! सर्व हक्क प्रेक्षकांच्या स्वाधीन.

मला आठवतंय, या चित्रपटाची पूर्वप्रसिद्धी सुरू होताच अनेक पत्रकारांनी निर्माता व दिग्दर्शक राकेश रोशनच्या मुलाखतीला पसंती दिली. तोपर्यंत मी 'खुदगर्ज' व 'करण अर्जुन' या चित्रपटांच्या निमित्ताने राकेश रोशनची दोनदा सविस्तर व एक्स्युझिव्हज मुलाखत केल्याने मी हृतिक रोशनच्या मुलाखतीला पसंती दिली. नवीन पिढीसोबत जोडून राहायला हवे हा मंत्र चित्रपटाचे जगही देतो. राकेश रोशनच्या फिल्म क्राफ्ट या निर्मिती संस्थेचे ऑफिस तेव्हा सांताक्रूझ पश्चिमेला होते, तेथून निरोप आला. जुहू येथील अमिताभ बच्चनच्या प्रतिक्षा बंगल्याच्या मागच्या रस्त्यावरील कविता बिल्डिंगमधील पाचव्या मजल्यावर राकेश रोशनचे घर आहे, तेथे हृतिक रोशनची भेट घेता येईल. त्यानुसार मी गेलो. एक लक्षात घ्या, तोपर्यंत हृतिक रोशन या नावाला अजिबात ओळख नव्हती. ग्लॅमर नव्हते. राकेश रोशनचा मुलगा अशी व इतकीच त्याची ओळख होती आणि ती जपूनच सवडीनुसार तो दररोज एक मुलाखत देत होता. तशा पद्धतीनुसार मुलाखत घेणे नि देणे यांचे ते छान दिवस होते. आठवणीत राहिलेत. त्या घरात राकेश रोशनने एके काळी भूमिका केलेल्या 'घर घर की कहानी', 'पराया धन', 'खेल खेल मे', 'झूठा कहीं का' 'हत्यारा' अशा चित्रपटांच्या यशाच्या स्मरणचिन्ह (अर्थात ट्रॉफिज) पाहून मी हृतिक रोशनला प्रश्न केला, हे चित्रपट तू पाहिले आहेस का? तो छान हसला आणि नाही म्हणाला, पण माझं हिंदी ऐकून मी महाराष्ट्रीय आहे हे लक्षात येताच तो म्हणाला, शाळेत असताना मला पन्नास गुणांचे मराठी होते. त्याचा हा प्रांजळपणा मला आवडला. (डिजिटल मीडियात हीच जणू बातमी). मला आठवतंय, त्या घरातील दूरसंचवाणीवर भारत विरुद्ध न्यूझीलंड कसोटी क्रिकेट सामना सुरू होता. थोडा वेळ तो आम्ही एन्जॉय केल्यावर मग आमची मुलाखत रंगली. तोपर्यंत तो 'चित्रपटात आलेला नवीन चेहरा' होता, त्यामुळेच त्याच्या वागण्या/बोलण्यात/ पाहण्यात/ ऐकण्यात एक प्रकारचे साधेपण होते.

या चित्रपटाच्या अंधेरीतील एक पंचतारांकित स्थळी गाण्याच्या ध्वनिफित प्रकाशन सोहळ्यातही हृतिक रोशनचं एकूणच वागणं/वावरणं हे अगदीच सर्वसाधारण असेच होते. इतकेच की त्याची मैत्रीण सुझान खान आपले पिता संजय खान व आईसोबत आली होती. राकेश रोशन मात्र अतिशय रूबाबात वावरत होता आणि अगदी अपेक्षेप्रमाणेच त्याचे मित्र जितेंद्र व ऋषि कपूर यांच्या हस्ते ऑडिओ रिलीज झाले. विशेष उल्लेखनीय गोष्ट जया बच्चन या इव्हेन्टसला हजर होत्या. ते दिवसच वेगळे होते. अशा सोहळ्याच्या आठवणी मनात जागा मिळवत. चित्रपटसृष्टीत प्रत्यक्षात भटकंती/निरीक्षणे करण्यातून हे आले. मनात राहिले.

मुंबईतील आम्हा चित्रपट समीक्षकांसाठी गोरेगावच्या दादासाहेब फाळके चित्रनगरीतील मिनी थिएटरमध्ये झाला. छान मनोरंजक चित्रपट अशीच आमची सर्वसाधारण प्रतिक्रिया होती आणि असे ढिगभर पिक्चर पाहिल्याने त्यात आणखीन एक भर असाच एकूण मामला होता.

पिक्चरची गाणी हा कायमच महत्त्वाचा सेट. आपल्या देशातील चित्रपट संस्कृतीतील जान. मराठी व हिंदीसह तब्बल पस्तीस भाषेत चित्रपट निर्माण होताहेत त्यातील गीत संगीत व नृत्य संस्कृती बहुस्तरीय. कहो ना... ची गाणी अतिशय वेगाने लोकप्रिय झाली. युवा पिढीला कॅची वाटली. ही एम टीव्ही पिढी होती. अजून हातोहाती मोबाईल आला नव्हता, पण तरुण संगीत हवं होते. त्यातच नृत्य दिग्दर्शिका फराह खानने हृतिक रोशनला दिलेल्या नृत्य स्टेप्स भन्नाट व स्टाईलीश. कहो ना... प्यार है, ना तुम जानो ना हम, प्यार की कश्ती मे, चांद सितारे, दिल ने दिल को पुकारा, एक पल का जीना... तरुणाईवर या प्रत्येक गाण्याची विलक्षण जादू. गाण्यांसाठी पुन्हा पुन्हा हा चित्रपट पाहू जाऊ लागला. गाण्यांसाठी आपल्या देशातील चित्रपट रसिकांनी अनेक चित्रपट पुन्हा पुन्हा एन्जॉय केलेत. चित्रपटात हृतिक रोशनची रोहित व राज चोप्रा अशी दुहेरी भूमिका. एकसारखेच दिसणारे दोघे आणि प्रेमकथा व सूडाची गोष्ट याभोवतीची हनी इराणीची पटकथा. चित्रपटातील राज आणि सोनिया सक्सेना (अमिषा पटेल) यांच्या पहिल्या भेटीचा प्रसंग हा हृतिक रोशन व सुझानच्या प्रत्यक्षातील पहिल्या भेटीसारखाच अशी 'स्टोरी' रंगली. अशा गोष्टी चित्रपटाला फोकसमध्ये ठेवतात.

मध्यंतरनंतर न्यूझीलंडच्या अतिशय अप्रतिम अशा दिलखुलास मोकळ्याढाकळ्या निसर्ग सौंदर्यात. (न्यूझीलंडला शूटिंगला जा हा सल्ला गीतकार व दिग्दर्शक सावनकुमार यांचा. 'सनम हरजाई'चं त्यांनी तेथेच शूटिंग केले होते.) कहो ना...च्या देखणेपणात न्यूझीलंडचा वाटा खूपच महत्त्वाचा. अहो, पिक्चर हिट होताच चक्क न्यूझीलंडचे पर्यटन वेगाने वाढले. चित्रपटाचे यश बरेच काही घडवत असतेच असते. काही महिन्यांनी याची परतफेड करण्यासाठी की काय न्यूझीलंडचे विदेश मंत्री भारत भेटीवर आले आणि दक्षिण मुंबईतील एका शानदार हॉटेलमध्ये शानदार खाना आयोजित केला होता. मला आठवतंय त्यात राकेश रोशनला किती बोलू नि किती नको असे झाले होते. चित्रपटाच्या जगात यश हेच चलनी नाणे असल्यानेच अशा अनेक लहान मोठ्या गोष्टी घडत असतात.

पिक्चर सुपरहिट झाला आणि अनेकांना करिना कपूरची आठवण आली. यामागे एक 'स्टोरी' आहे. चित्रपट सरळ रेषेत बनतीलच याची खात्री नसते.

'कहो ना...प्यार है'मध्ये तीच हृतिक रोशनची नायिका होती. मुंबईत महालक्ष्मी येथील फेमस स्टुडिओतील पहिल्या चित्रीकरण सत्रात तिने भागही घेतला. त्या शूटिंगच्या बातम्या आल्या. त्यात हृतिक रोशनपेक्षा करिनाचे अर्थात बेबोचे पारडे जड वाटत होते. काही झाले तरी ती कपूर. तीच 'रोशन' असणार.

अभिषेक बच्चन अभिनय क्षेत्रात आला आणि कहानी मे ट्विस्ट आला. अमिताभ बच्चनचा मुलगा म्हणजे अतिशय वजनदार गोष्ट. करिना अर्थात बेबोच्या अतिशय महत्त्वाकांक्षी आई बबिताला वाटलं, ह्य... हृतिक रोशन काय? त्यापेक्षा अभिषेक बच्चन मोठ्ठ नाणे. सोनेरी संधी. त्याच्यासोबत करिनाचा पहिला चित्रपट असावा. तिने तशी राकेश रोशनला कल्पना देत 'कहो ना...'मधून करिनाला बाहेर काढून जे.पी. दत्ता दिग्दर्शित 'रिफ्यूजी'मध्ये करिनाला अभिषेक बच्चनची नायिका केले. स्टार मांचा फिल्मी हट्ट दुसरं काय? आणि अमिषा पटेलला 'कहो ना...'ची जणू लॉटरी लागली. चित्रपटाच्या जगातील पडद्यामागच्या गोष्टी जास्त रंगतदार असतात. त्यालाही चित्रपटाच्या प्रवाहात स्थान आहे हो.

हृतिक रोशनने बालकलाकार म्हणून आपले आजोबा जे. ओम प्रकाश यांच्या दिग्दर्शनातील आशा, आसपास, भगवानदादा या चित्रपटात भूमिका साकारल्याने 'चित्रपट कॅमेरा' साधारण माहित होता. वयात येताना आपले दिग्दर्शक पिता राकेश रोशनच्या करण अर्जुन, कोयला, कारोबारच्या वेळेस सहाय्यक दिग्दर्शक म्हणून उमेदवारी करताना चित्रपटाच्या सेटवरचे वातावरण आणि हे माध्यम याच्याशी त्याचा परिचय वाढला. राकेश रोशनचा मुलगा म्हणून त्याला स्पेशल ट्रीटमेंट अजिबात नव्हती. चित्रपटसृष्टीत येताना अशा लहान मोठ्या गोष्टी फारच उपयुक्त असतात याचा धडा या क्षेत्रात येणाऱ्यांसाठी खूप महत्त्वाचा. हृतिक रोशनमधील नवीन गोष्टी शिकण्याची प्रवृत्ती त्यालाच हितकारक ठरली. त्याचं फिजिक्स (दणकट शरीरयष्टी), वेगळीच नृत्य शैली या गोष्टीवरचे त्याचे लक्ष आणि त्यावरची त्याची मेहनत उल्लेखनीय. स्टार एका दिवसात घडत नसतो. त्यामागे असा एक प्रवास असतो. कहो ना...च्या यशाच्या मंतरलेल्या वातावरणातील त्याच्या अफाट क्रेझने शाहरूख, आमिर, सलमान या खानावळीलाही मागे सारले. त्यांचा एक उत्तम स्पर्धक निर्माण झाला.

...हे सगळं कलरफुल घडून चक्क पंचवीस वर्ष झालीदेखील? म्हणजे रसिकांच्या दोन पिढ्या ओलांडूनही हा चित्रपट सतेज, तारुण्यात, त्याचं आकर्षण कायम आहे. आजही यातील एक पल का जीना... गाण्यावर क्लब, पब, पार्टीत आजची तरुणाई नाचायला लागते, तेव्हा चित्रपटाचे नाव सार्थ होते कहो ना...प्यार है!

# बालकांअगोदर पालकांनी संस्कारांचे महत्त्व समजणे अत्यंत गरजेचे

आज राष्ट्रीय युवा दिन. आजच्या आधुनिक जगाचे वास्तव हे आहे की दुर्दैवाने पालकांचे वागणे मुलांना नकारात्मकतेकडे ढकलत आहे. मुलांमध्ये चिडचिडेपणा, हट्टीपणा, अयोग्य वागणूक यासह शारीरिक आणि मानसिक आरोग्याच्या समस्या सातत्याने वाढत आहेत. जन्मावेळी बालकांचा अपुरा विकास, कुपोषण, अपंगत्व यासारख्या समस्याही वाढत आहेत. आधुनिकतेच्या नावाखाली आपण आपल्या चांगल्या गोष्टी, संस्कार, विचार विसरून वाईट गोष्टींमध्ये गुरफटून जगणे कठीण केले आहे.

अनेक पालकांना किंवा घरातील वडीलधाऱ्यांना आपल्या मुलांसमोर कसे वागावे हेदेखील कळत नाही, त्यामुळे कुटुंबात, समाजात, देशात आणि जगात समस्यांचा डोंगर उभा राहतो. मुलं रडतात म्हणून त्यांना मोबाईलचं व्यसन लावलं जातं, मुलं हट्ट करतात म्हणून त्यांना जंक फूड खायला दिलं जातं. मुलांच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यासाठी हानिकारक असलेल्या वस्तू आणि खाद्यपदार्थ त्यांना प्रेमाने पुरवले जातात आणि आजची पिढी खूप बिघडलेली असून पालकांचे अजिबात ऐकत नाही, असे खुद्द पालकच सांगतात. संस्कृतीहीन, असंवेदनशील, नैतिकताहीन आणि स्वार्थी समाजाचा आपण अविभाज्य घटक बनलो आहोत.

या वर्षी शिक्षक दिनानिमित्त, एका शाळेतील सांस्कृतिक कार्यक्रमाचा भाग म्हणून लहान मुली नृत्य करतानाचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. तो व्हिडीओ पाहून मला आश्चर्य वाटले, सहा-सात वर्षांच्या शाळकरी मुली फिल्मी गाण्यांवर नाचत होत्या, चित्रपट अभिनेत्रींसारखे हुबेहूब आधुनिक पोशाखात या लहान मुली त्या शिक्षणाच्या मंदिरात नाचत आणि आज की रात मजा हुस्न का, आँखो से लीजिये गात होत्या. शिक्षकांचा सन्मान करण्यासाठी शिक्षक दिन साजरा केला जातो, तिथे या चिमुकल्या मुली कसले नृत्य सादर करत आहेत, त्या शाळेतील शिक्षकांना आणि त्या मुलींच्या पालकांना काय म्हणावे? असे कार्यक्रम का आयोजित केले. आजच्या आधुनिक पिढीला आपल्या देशातील थोर समाजसुधारक, शास्त्रज्ञ, महान क्रांतिकारक देशभक्तांबद्दल माहिती असेल किंवा नसेल, पण त्यांच्याकडे रील, फॅशन आणि फिल्म इंडस्ट्रीची माहिती आहे. मुलांचे आदर्श देशासाठी लढणारे शूर सैनिक, संघर्ष करणारे समाजसुधारक नसून चित्रपटातील नायक-नायिका आहेत, कारण मुलांना आकर्षक वाटणारी अशी मनोरंजक माहिती त्यांना सहज उपलब्ध असते.

आजकाल संयुक्त कुटुंबे लहान कुटुंबात विभक्त होत आहेत. बहुतेक कुटुंबांमध्ये पालकांना मुलांची काळजी घेण्यासाठी वेळ नसतो. मुलं त्यांचा वेळ कुठे घालवतात, त्यांचा दिनक्रम काय आहे, बहुतेक पालकांना त्यांची मुले किती पैसे कुठे खर्च करतात हेदेखील माहीत नसते. मुले जे काही बोलतात त्यावर पालक विश्वास ठेवतात. अनेक वेळा अतिआत्मविश्वास आणि मुलांचे अति लाड भविष्यात कुटुंबाला, समाजाला आणि देशाला महागात पडतात. आजकाल लहान मुलांमध्ये गुन्हेगारी प्रवृत्ती खूप वाढली आहे, ते लहान सहान गोष्टींवर रागावतात, ड्रग्जचे सेवन करतात, शस्त्रे बाळगतात आणि टोळ्यांमध्ये फिरतात. छोट्या-छोट्या गोष्टींवर लढायला तयार होतात. कितीही महागडे शिक्षण दिले तरी त्यांना योग्य वळण मिळत नाही, विद्यार्थ्यांमध्ये अपमानास्पद भाषा, शिवीगाळ आणि अपशब्द वापरण्याचे प्रमाण अतिशय वाढले आहे. गंभीर गुन्ह्यांमध्ये अल्पवयीन मुलांचा सहभाग असल्याच्या बातम्या आपण अनेकदा वाचतो, ऐकतो. खून, बलात्कार, चोरी, दरोडे, अमली पदार्थांची तस्करी आणि प्राणघातक हल्ले अशा अनेक टोळ्यांमध्ये अल्पवयीन मुलांचाही सहभाग आहे. नुकतेच मध्य प्रदेशातील छतरपूर येथे एका शालेय विद्यार्थ्याने आपल्या प्राचार्यांची गोळ्या झाडून हत्या केली. काही मुली आणि मुले हट्ट पूर्ण न झाल्यास पालकांनादेखील मारण्यास भीत नाही. ही मुले जन्मतः गुन्हेगार नसतात, पण पालकांच्या बेजबाबदारपणामुळे आणि निष्काळजीपणामुळे ते मुलं गुन्हेगार बनतात आणि संपूर्ण समाजासाठी धोकादायक ठरतात.

नवीन पिढीच्या बहुतेक महिलांना घरी जेवण बनवायला आवडत नाही, म्हणून त्यांना नेहमीच चविष्ट



जेवणासाठी हॉटेलमध्ये जावे लागते. शरीराला आवश्यक पोषक तत्वे मिळत नाहीत, त्यामुळे तब्येत नेहमीच खराब राहते. मुलांनाही बाहेरचे खाण्याची सवय लागते. आजारपण सातत्याने वाढत आहेत. मुलांना स्वतःचे बरे-वाईट कळत नाही, पण पालकही आपल्या मुलांवर नियंत्रण ठेवत नाहीत, उलट ते त्यांना बिघडवतात. अनेकदा आई-वडील घरातील मोठ्यांशी अमानुषपणे वागवतात, पण तेच पालक आपल्या मुलांकडून आदर्श चारित्र्याची अपेक्षा करतात. आपल्या सुसंस्कृत समाजात मुले लग्नाआधीच आपल्या कुटुंबापासून विभक्त झालेले किंवा वडीलधाऱ्यांना, आई-वडिलांना वृद्धाश्रमात सोडून गेल्याचे पाहायला किंवा ऐकायला मिळत नाही, पण लग्नानंतर कुटुंबापासून वेगळे होणे ही आता सामान्य गोष्ट झाली आहे. आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यात जेव्हा ही असहाय्य वृद्ध व्यक्ती अशक्त शरीराने जीवनसंघर्षाशी झुंजत असते, तेव्हा त्यांना आपल्या प्रियजनांच्या आधाराची सर्वाधिक गरज असते आणि त्याच क्षणी ते त्यांना सोडून जातात.

आजच्या आधुनिक वातावरणात जिथे अनेक सुख-सुविधा आहेत, पण या आधुनिकतेत माणसाने आपला आनंद, शांती, समाधान, नैसर्गिकता आणि निरागसता गमावली आहे. माणूस इतका खालच्या पातळीवर गेला आहे की अनेक वेळा माणसांचा स्वार्थ पाहून असे वाटते की, त्याच्यापेक्षा पशु-पक्षी श्रेष्ठ आहेत, जे स्वतःच्या फायद्यासाठी दुसऱ्यांचे जीवन उद्ध्वस्त करत नाहीत. फॅशन आणि आधुनिक जीवनशैलीमुळे आपण आपली संस्कृती विसरत चाललो आहोत. गुन्हेगारी, भ्रष्टाचार, पदाचा आणि सत्तेचा दुरुपयोग, प्रदूषण, भेसळ, सर्वत्र राजकीय हस्तक्षेप, अश्लीलता, खोटेपणा, दिखाऊपणा, भेदभाव, फसवणूक, अमली पदार्थांचे व्यसन, लोभ, असभ्य वर्तन, मत्सर या दूषित वातावरणात मनःशांती मिळवणे हा एक भ्रम आहे.

अनेक पालकांना मुलांच्या अत्यावश्यक गरजा आणि त्यांचा हट्टीपणा यातील फरक समजत नाही. लहानपणापासूनच महागडे छंद, हट्टीपणा, गर्लफ्रेंड-बॉयफ्रेंडच्या नात्याचा ट्रेंड, ताणतणाव, आधुनिकता, खोटा देखावा, चित्रपट आणि सोशल मीडियाचा मुलांच्या मनावर होणारा वाईट प्रभाव यामुळे चुकीच्या गोष्टींकडे आकर्षण वाढून त्यांचे जीवन विषारी झाले आहे. पालक सतत व्यस्त राहणे, मुलांच्या दिनचर्येकडे लक्ष न देणे, मुलांवर ताबा नसणे, मुलांच्या चुकांकडे नेहमी दुर्लक्ष करणे, केवळ महागडी उपकरणे किंवा भौतिक सुविधा देणे, मुलांचे अवाजवी लाड करणे आणि त्यांची प्रत्येक इच्छा पूर्ण करणे पालकांनी केवळ यालाच जबाबदारी समजून घेतली आहे. पालक मुलांसमोर आदर्शवादी मार्गदर्शकाची भूमिका बजावत आहेत का? जेणेकरून मुलांना संस्कार, शिकवण, जबाबदारी समजेल. मुलांचे योग्य संगोपन आणि पोषक वातावरण योग्य वेळी देणे अत्यंत आवश्यक आहे. एकदा वेळ निघून गेली की पश्चाताप करण्याशिवाय काहीच उरत नाही, मग त्या चुकीचे परिणाम त्या व्यक्तीला आयुष्यभर भोगावे लागतात. पालकांनी आधुनिक व्हावे, पण केवळ विचाराने आणि तोच विचार पुढच्या पिढीपर्यंत पोचवला पाहिजे. पालकांनी जागरूक होऊन मुलांना सुसंस्कृत बनवले तर समाजातील नव्वद टक्के समस्या सुटतील.

आई-वडील कितीही व्यस्त असले, गरीब असोत वा श्रीमंत आपल्या मुलांसाठी वेळ काढणे ही पालकांची जबाबदारी असते. आजची मुले उद्याच्या देशाचे उज्ज्वल भविष्य आहेत. मुलांना जितके चांगले संस्कार मिळतील तितका देश अधिक चांगला आणि मजबूत होईल. पालकांच्या चुकांची शिक्षा मुलांना भोगावी लागू नये. मुले पालकांच्या वर्तनाचे अनुकरण करतात, म्हणून पालकांचे वर्तन नेहमी मुलांसमोर अनुकरणीय असावे. मुलांना उत्कृष्ट वागणूक आणि पोषक वातावरण प्रदान करा. मुलांना चांगल्या वाईटात फरक करायला शिकवा, दुर्बलांना मदत आणि स्त्रियांचा आदर करण्यास शिकवा. मुलांना पैसे कसे कमवायचे हे शिकवण्यापूर्वी पालकांनी त्यांना प्रामाणिकपणे आनंदी जीवन कसे जगायचे हे शिकवले पाहिजे. देशातील उद्याच्या पिढीचे भविष्य आज पालकांच्या हातात आहे, त्या पिढीला सुसंस्कृत आणि सक्षम बनवा. सुसंस्कृत पालकच संस्कारशील मुले घडवू शकतात आणि त्यांना उज्ज्वल भविष्यासाठी सक्षम बनवू शकतात.

**-डॉ. प्रितम गेडाम**

# युवकांचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद



स्वामी विवेकानंद हे उच्च विचाराचे महान व्यक्ती होते. त्यांच्या विचारांचा आध्यात्मिक, ज्ञान आणि सांस्कृतिक अनुभवाचा प्रत्येक व्यक्तीवर विशेष प्रभाव पडतो. ते तरुणांसाठी मार्गदर्शक आणि भारताचा अभिमान आहे. स्वामी विवेकानंद यांचा जन्म १२ जानेवारी १८६३ रोजी कोलकाता येथे झाला. त्यांचे मूळ नाव नरेंद्र, तर त्यांच्या वडिलांचे नाव विश्वनाथ दत्त आणि आईचे नाव भुवनेश्वरी होते. त्या धार्मिक वृत्तीच्या होत्या. यामुळे त्यांच्यावर चांगले संस्कार होते. त्यांचे वडील उच्च न्यायालयात वकिली करत होते.

स्वामी विवेकानंद एक विचारवंत व अलौकिक प्रतिभावंत होते. ते लहान असताना त्यांना इतिहास साहित्य अशा अनेक विषयांची आवड होती. त्यांनी तत्त्वज्ञान, धर्म, इतिहास, सामाजिक विज्ञान, कला व साहित्य इत्यादी विषयाचे सखोल ज्ञान मिळवले. त्याचबरोबर त्यांनी वेद, उपनिषद, पुराण, रामायण-महाभारत अशा ग्रंथांचा अभ्यास केला. त्यांना वाचन, व्यायाम, कुस्ती, पोहणे, घोडेस्वारी, गायन-वादन इत्यादींची आवड होती.

स्वामी विवेकानंदांनी आपल्या घरीच शिक्षणाची सुरुवात केली. इंग्रजी भाषेचे त्यांना ज्ञान होते. त्यांचे वडील विश्वनाथ दत्त पाश्चात्त्य संस्कृतीत विश्वास ठेवायचे आणि ते आपल्या मुलाला म्हणजे नरेंद्रलादेखील इंग्रजी शिकवून पाश्चात्त्य संस्कृतीची शिकवण देऊ इच्छित होते. नरेंद्रची बुद्धी लहानपणापासून तल्लख होती. त्यांच्यामध्ये आई- वडिलांचे चांगले गुण आले होते. त्यामुळे त्यांच्या जीवनाला एक नवा आकार मिळाला आणि ते उत्तम गुणवत्तेचे धनी झाले. त्यांच्यामध्ये देवप्राप्ती करण्यासाठी प्रबळ तळमळ होती. यासाठी ते ब्रह्म समाजात गेले. तरीही त्यांना काही समाधान मिळाले नाही. त्यांनी ललित कलेची परीक्षा १८८१मध्ये उत्तीर्ण केली. नंतर १८८४मध्ये त्यांनी कलेचे शिक्षण पूर्ण केले. त्याच वर्षी त्यांनी बीएची परीक्षा चांगल्या पात्रतेने उत्तीर्ण केली आणि कायद्याचा अभ्यास केला.

नंतर विवेकानंदांनी ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्या मेट्रोपोलिटन इन्स्टिट्यूटमध्ये प्रवेश घेतला. बीएची परीक्षा उत्तीर्ण केली. पुढे ते स्वामी रामकृष्ण परमहंस यांना भेटले आणि त्यांनी परमहंस यांना आपले गुरु मानले. रामकृष्ण यांनी नरेंद्र यांना दीक्षा दिली आणि त्यांचे नाव स्वामी विवेकानंद केले. विवेकानंद यांनी रामकृष्ण मठाची स्थापना केली.

रामकृष्णांचा संदेश जनमानसात पोहचावा यासाठी विवेकानंद यांनी रामकृष्ण मिशनदेखील सुरू केले. रामकृष्ण यांनी समाधी घेतल्यावर ते भारतभ्रमणासाठी बाहेर पडले आणि कन्याकुमारी येथे पोहचले. त्यांनी भारताच्या कल्याणासाठी आणि जनतेचा उद्धार करण्यासाठी आपले आयुष्य समर्पित केले. मातृभूमीची सेवा करण्यासाठी त्यांनी आपले आयुष्य अर्पित केले. नरेंद्र यांनी वयाच्या २५व्या वर्षी भगवे वस्त्र धारण केले. त्यानंतर त्यांनी संपूर्ण भारताचा पायीच प्रवास केला. पुढे त्यांनी आपले विचार जगभरात पोहचावे यासाठी अमेरिकेतील शिकागो येथे सर्वधर्मीय परिषदेत भारताचे नेतृत्व करून आपल्या सुंदर वक्तृत्वाने अमेरिकेतील लोकांची मने जिंकली. विवेकानंदांनी भाषण करताना माझ्या प्रिय बंधू भगिनींनो असे उद्‌गार काढताच परिषदेत दोन मिनिटे टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला.

आध्यात्मवाद आणि भारतीय तत्त्वज्ञानांशिवाय जग अनाथ होईल असा स्वामी विवेकानंदांचा दृढ विश्वास होता. त्यांनी अमेरिकेतदेखील रामकृष्ण परमहंस मिशनच्या अनेक शाखा स्थापन केल्या. अनेक अमेरिकी विद्वानांनी त्यांचे शिष्यत्व ग्रहण केले. त्यांचे अनमोल विचार आजही जगाला प्रेरणा देत आहेत. अशा या थोर व्यक्तिमत्त्व असणारे घोर गरिबांचे सेवक स्वामी विवेकानंद यांचे ४ जुलै १९०२ रोजी पश्चिम बंगालमधील बेलूर मठ येथे निधन झाले. **(साभार : वेबदुनिया)**

## निवडक

### वाघेरी विद्यालयात विज्ञान प्रदर्शन



**माणगाव :** छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण संचालित जय जवान जय किसान माध्यमिक विद्यालय वाघेरी येथे शाळांतर्गत आविष्कार कल्पकते कडून कृतीकडे २०२४-२५ विज्ञान प्रदर्शन मंगळवारी झाले. विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन वारंगीचे सरपंच दत्ताराम ढेबे, शाळेचे मुख्याध्यापक प्रकाश देवरुखकर यांच्या हस्ते करण्यात आले.या विज्ञान प्रतिकृतीतून प्रथम क्रमांकाची प्रतिकृती विभाग स्तरावर शाळेचे प्रतिनिधित्व करणार आहे. विज्ञान शिक्षक सागर शेपुंडे यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन केले. या विज्ञान प्रदर्शनाचे परीक्षण विज्ञान शिक्षक व मुख्याध्यापक तात्यासाहेब नातू विद्यालय कुर्ले विद्यालयाचे विज्ञान शिक्षक अनंत शेलार यांनी केले.

### दत्ताराम शिर्के यांचा विजय

**माणगाव :** पेण प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढीचे संचालक पद रिक्त झाले होते. या पदासाठी जिल्हा उपनिबंधक कार्यालयाकडून पोटनिवडणूक झाली. यात परिवर्तन



पॅनलकडून अखिल माणगाव प्रा. शिक्षक संघाचे तालुका अध्यक्ष दत्ताराम अर्जुन शिर्के यांनी संचालक पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. त्यांच्याविरुद्ध माणगावच्या विनया विवेक जाधव यांनी अर्ज दाखल केला होता. त्यामुळे मतदान प्रक्रिया पार पडून दत्ताराम शिर्के यांना उपस्थित १७ संचालकांपैकी १४ मते पडली व विनया जाधव यांना ० मते पडली. तीन संचालकांनी मतदान प्रक्रियेत सहभाग घेतला नाही. अशा प्रकारे दत्ताराम शिर्के यांचा १४च्या मताधिक्याने विजय झाला.



**खालापूर : सिमेंट वाहतूक करणाऱ्या बल्कर वाहनाला शनिवारी सकाळी पाली फाटा येथे आग लागली होती. देवदूत यंत्रणेने घटनास्थळी दाखल आग विझवली.**

# श्रीवर्धन आगारात अनियोजित कारभार



## प्रवासीवर्ग त्रस्त; आवश्यक गाड्यांची मागणी

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

कोकण विभागात आर्थिक उत्पन्नाच्या बाबतीत नेहमीच अग्रस्थानी असणारे श्रीवर्धन आगार सध्या अनियोजित कारभारामुळे प्रवासी वर्गासाठी त्रासदायक ठरत आहे. नियमित वेळापत्रकानुसार होणाऱ्या गाड्या बंद केल्या जात आहेत, तर मागणी न केलेल्या गाड्या नियमितपणे सुरू होतात. हेच नव्हे, तर लांब पल्ल्याच्या गाड्यांना अधिक थांबे दिले जात आहेत, ज्यामुळे श्रीवर्धन तालुक्यातील प्रवासी अत्यंत त्रस्त झाले आहेत.

श्रीवर्धन आगाराची स्थापना १९८७मध्ये झाली आणि या आगारामुळे मुंबई, रत्नागिरी, सातारा, कोल्हापूर इत्यादी जिल्ह्यांना श्रीवर्धन तालुक्याशी जोडले गेले. श्रीवर्धन आगारामुळे प्रवासी वर्गाला एसटी वाहतुकीचा मोठा आधार मिळाला, परंतु सध्या काही गाड्या बंद करण्यात आल्या आहेत. प्रशासनाने प्रवाशांच्या मागण्यांकडे लक्ष देण्याची मागणी होत आहे.

श्रीवर्धन आगारातून नियमितपणे सुरू होणारी गाड्या जसे की श्रीवर्धन-मुंबई (०४:४५), श्रीवर्धन-अलिबाग (०५:४५) आणि श्रीवर्धन-सातारा इ. अनेकदा रद्द होतात. आर्थिक उत्पन्न कमी झाल्याचे कारण देऊन गाड्या बंद केल्या जात आहेत, त्यामुळे प्रवासी वर्ग नाराज आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनीही अनेकदा गाड्यांच्या सुरूवातीसाठी निवेदन दिले, परंतु ते नाकारले जात आहेत.

श्रीवर्धन तालुक्यातील प्रवासी वर्गाच्या सुविधेसाठी गाड्या सुरू करण्याबाबत प्रशासनाकडून यथार्थ निर्णय घेतले जात नाही. सुट्टीच्या हंगामात गाड्या सुरू कराव्यात या मागणीला प्रशासनाने धीरगंभीरतेने दखल घेतली नाही.

सध्याच्या परिस्थितीत, श्रीवर्धन आगाराची गाड्या नागोठणे ते खारपाडादरम्यान अनेक थांब्यांसोबत सुरू केली जात आहेत, ज्यामुळे प्रवाशांना आणखी अधिक त्रास सहन करावा लागत आहे.

अलिबाग जिल्ह्याचे प्रमुख ठिकाण आहे. शासकीय प्रमुख कार्यालय असल्याने ये-जा करणे प्रवासी वर्गास सोईचे होते. गाडी सध्या बंद ठेवण्यात आले असल्यामुळे अडचण भासते. गाडी सुरू होती तेव्हा शासकीय कामकाज सहजपणे पार पडत असते.

**जिल्ह्यातील प्रमुख कार्यालयांमध्ये कार्यरत असलेल्या नागरिकांसाठी ही गाडी सेवा त्वरित सुरू केली जावी, हे प्रशासनाने त्वरित ध्यानात घेणं अत्यंत आवश्यक आहे.**

**-हरिदास वाघे, अध्यक्ष, सागर शक्ती संस्था**

**श्रीवर्धन अलिबाग व श्रीवर्धन मुंबई या गाड्या उत्पन्न कमी या कारणाने बंद करण्यात आल्या आहेत. लातूर व बीड या गाड्यांना उत्पन्न चांगले मिळते. श्रीवर्धन आगाराकडे गाड्या कमी आहेत. प्रवासी वर्गाने मागणी केल्यास अलिबाग व मुंबई गाड्या सुरू केल्या जातील. मुंबई शहरांकडे जाणार्या गाड्यांना अनेक थांबे या बाबतीत मला कल्पना नाही. श्रीवर्धन आगार प्रमुखांशी या बाबतीत चर्चा करीन.**

**-दीपक घोडे, रायगड विभाग नियंत्रक, रामवाडी, पेण**

## साळावमध्ये घंडागाडीद्वारे क्षयरोग जनजागृती

**रेवदंडा : प्रतिनिधी**

माननीय प्रधानमंत्री महोदयांनी सन २०२५ ला भारत देशाला क्षयरोगापासून मुक्त करण्याचे ध्येय बाळगले आहे ते पूर्ण करण्यासाठी संपूर्ण देशपातळीवर राबविण्यात येत असलेल्या राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रम अंतर्गत ७ डिसेंबर २०२४ ते २४ मार्च २०२५ या कालावधीदरम्यान १०० दिवशीय क्षयरोग मोहीम राबवण्यात आली आहे.

यामध्ये मोठ्या प्रमाणात सर्व लोकांमध्ये विविध माध्यमातून जनजागृती करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून जिल्हा क्षयरोग केंद्र रायगड, तालुका आरोग्य अधिकारी-क्षयरोग पथक मुरुड,प्रा. आ. केंद्र बोर्ली - मांडला, उपकेंद्र चेहेर यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रुप ग्रामपंचायत साळाव अंतर्गत सर्व गावांमध्ये रोज घंडागाडी द्वारे क्षयरोगाची माहिती देणारी ध्वनी प्रक्षेपकाद्वारे जनजागृती करण्यात येत आहे.



यामुळे साळाव ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या लोकांमध्ये क्षयरोगाची जनजागृती होऊन क्षयरोग निर्मूलन होण्यास मदत होणार आहे. या कार्यक्रमाच्या उद्घाटनाप्रसंगी ग्रुप ग्रामपंचायत साळावचे सरपंच वैभव कांबळी, वरीष्ठ औषधोपचार पर्यवेक्षक संकेत घरत, आरोग्य सहाय्यक अरुण माळी, परिक्षीत कोळी, आरोग्यसेवक श्री गणेश जैतू, आरोग्य सेविका शिल्पा ठाकूर, गट प्रवर्तक रोशनी किल्लेकर, आशा सेविका कल्पना पाटील, माधुरी कांबळी उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांसाठी लोगो मेकिंग स्पर्धा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर आणि विज्ञान महाविद्यालयात शुक्रवारी (दि.१०) सांस्कृतिक विभागाच्या वतीने लोगो मेकिंग स्पर्धेचे आयोजन केले होते.



या स्पर्धेचा प्रमुख उद्देश महाविद्यालयातील सर्व शाखेतील प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींना बोधचिन्ह तयार करता यावे तसेच भविष्यामध्ये स्वतःचा व्यवसाय करण्यासाठी लागणारी वेगवेगळी कौशल्ये या स्पर्धेच्या माध्यमातून विकसित करता यावीत हा होता. या स्पर्धेसाठी महाविद्यालयातील व्यवसाय व व्यवस्थापन शिक्षण विभाग तसेच वाणिज्य, अकाउंट फायनान्स व विज्ञान तसेच संगणक, माहिती व तंत्रज्ञान विभागातील विद्यार्थी व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त असा प्रतिसाद दिला.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. या स्पर्धेचे आयोजन प्रा. डॉ. दीपिका हसीजा यांनी केले तसेच डॉ. महादेव चव्हाण, प्रा. शिवानी मानकामे, प्रा. नंदिनी सपकाळ, प्रा. प्रमोद वाघे, प्रा. शुभम शर्मा, प्रा. तनुजा सुमन व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

## ना.आदिती तटकरेंचा सत्कार

**मुरुड : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सोशल मिडीया रायगड जिल्हा उपाध्यक्ष हसमुख जैन यांनी मंत्री आदिती तटकरे यांचा सुतारवाडी येथे सत्कार केला.



जैन यांनी सांगितले की, मुरुच्या विकासासाठी कायम खासदार सुनील तटकरे मंत्री आदिती ताई, अनिकेतभाई तटकरे हे नेहमी कार्यतत्पर असतात. मुरुड तालुक्याच्या विकासात सिंहाचा वाटा त्यांचा असून या पुढे सुधा ते विकास करत रहाणार आहेत. जनता त्यांच्या पाठीशी उभे असल्याचे प्रतिपादन जैन यांनी केले. तर या सत्काराला उत्तर देताना महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी या सरकारमध्ये सर्वाधिक महत्त्व महिलांचे प्रश्न सोडविण्यावर दिला आहे. महिला स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी राज्य सरकार मार्फत विविध योजना राबवण्यात आलेल्या असून त्या लोकांपर्यंत पोहचवण्यात आम्ही यशस्वी ठरलो आहोत. आगामी काळात लवकरच लाडक्या बहिणी ना २१०० रुपये देण्याचा निर्णय होणार असून यामुळे महिला स्वायत होण्यास मदत होणार आहे. महिलांची उन्नती व महिलांचा विकास यावर जास्त भर देणार असल्याचे प्रतिपादन या वेळी आदिती तटकरे यांनी केले.

## विद्यार्थ्यांनी बनवले आकर्षक पेन स्टँड

**माणगाव : बातमीदार, प्रतिनिधी**

माणगाव येथील शैक्षणिक, सांस्कृतिक कला क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या शिपुरकर आणि वाघरे इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या संकल्पनेतून विविध प्रकारचे कलात्मक रंगीबेरंगी आणि आकर्षक पेन स्टँड वर्गात शिक्षकाच्या समक्ष तयार केले.

विद्यार्थ्यांच्या कल्पना शक्तीला वाव आणि संधी मिळावी. त्यांना सतत प्रोत्साहन देण्यासाठी अशा विविध प्रकारचे शैक्षणिक उपक्रम राबविले जातात. त्यामुळे विद्यार्थी हुशार, कृतिशील, उपक्रमशील बनतात. याचा विद्यार्थ्यांना भविष्यात चांगल्या प्रकारे शैक्षणिक लाभ होतो. तसेच विद्यार्थी अष्टपैलू बनतात. त्यांचा व्यक्तिमत्त्व विकास वृद्धिंगत होतो. विशेषतः विद्यार्थी स्मार्ट आणि अक्टिव बनतात, असे मुख्याध्यापिका मनिषा मोरे यांनी सांगितले.



## फार्मसी महाविद्यालयात ९२ जणांचे रक्तदान

**कर्जत : प्रतिनिधी**

कोंकण ज्ञानपीठ राहुल धारकर फार्मसी महाविद्यालयात संस्थेचे संस्थापक स्व. अप्पासाहेब धारकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ९२ जणांनी रक्तदान करून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी यांनी आयोजित केलेले हे ५०५ वे शिबिर ठरले. सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.

या वेळी संस्थेचे सदस्य झुलकरनैन डाभिया, प्राचार्य डॉ. मोहन काळे. डॉ. रमेश सिंग, डॉ. अमोल चांदेकर, डॉ. निलोफर खान, डॉ. उज्वला ठुबे, प्रा. विशाल शेळके आदी उपस्थित होते. कोठारी यांनी, आपल्यावर वेळ येते तेंव्हा रक्ताची किंमत कळते. प्रत्येक विद्यार्थ्याने रक्तदान करावे. रक्तदानामध्ये देशात आपला महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आहे.' असे सांगितले. डॉ. काळे यांनीही रक्तदानाचे महत्व सांगितले.

सर्वप्रथम डॉ. अमोल चांदेकर व संजीव ठाकरे यांनी रक्तदान करून रक्तदानाचा शुभारंभ केला. समर्पण रक्त केंद्र घाटकोपरच्या डॉ. रमेश सिंग, लक्ष्मण नाईक, संजय ठोंबरे, नुसरित मलिक, धनश्री लाड, शिला वाघमारे यांनी रक्त संकलनाचे काम केले. याप्रसंगी जयवंत म्हसे, कृष्णा जाधव, निकेत मंडावळे, विजय जिनगरे, निशिकांत मोधळे आदी उपस्थित होते.

## सोपान जांबेकरांचा वाढदिवस समाजिक उपक्रमांनी साजरा

**नागोठणे : बातमीदार**

भाजप नागोठणे तर्फे भाजप दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष सोपान जांबेकर यांचा वाढदिवस विविध समाजपयोगी कार्यक्रमाने साजरा करण्यात आला.

नागोठणे येथील डॉ. नेल्सल मंडेला आश्रम शाळेतील विध्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले तसेच नागोठणे येथील कोकणे हॉस्पिटलमधील रुग्णांना फळ व बिस्कीटचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमावेळी भाजप जिल्हा उपाध्यक्ष सोपान जांबेकर, तालुका सरचिटणीस आनंद लाड, युवा नेते निखिल मढवी, शहर अध्यक्ष सचिन मोदी, तालुका क्रीडा संयोजक शेखर गोळे, शिक्षण सेल रोहा तालुका अध्यक्ष अशोक अहिरे, उपाध्यक्ष धनराज उमाळे, गणेश घाग, संजय नांगरे, विठोबा माळी, गौतम जैन, महिला मोर्चाच्या संज्योती लाड आदी प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन शहराध्यक्ष सचिन मोदी यांनी केले होते.



पान ३ वरुन

## कोण पटकावणार बहुमानाचा अटल करंडक? उत्सुकता शिगेला

या एकांकिकांना रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला आहे. उत्कृष्ट आयोजन व नियोजन, भरघोस रकमेचे पारितोषिके, ज्येष्ठ कलाकारांचे मार्गदर्शन आणि संधी यांचा मिलाप असलेल्या या स्पर्धेतून आजवर अनेक कलाकार घडले आहेत. नाट्य चळवळ वृद्धींगत व्हावी व नाट्यरसिकांना आपले नाट्याविष्कार प्रदर्शित करता यावे, त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळावे तसेच माजी पंतप्रधान भारतरत्न स्व. अटलबिहारी वाजपेयी यांच्या विचारांचा वारसा अविरत चालावा यासाठी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, महापालिकेचे माजी सभागृहनेते व नाट्य परिषद पनवेल शाखा उपाध्यक्ष परेश ठाकूर यांनी अटल करंडक एकांकिका या दर्जेदार स्पर्धेचा प्रारंभ केला. नामवंत, उमदे आणि हौशी कलावंत या स्पर्धेकडे नेहमीच आकर्षित होतात. स्पर्धेचे देखणे व नीटनेटके संयोजन, आकर्षक पारितोषिके, दर्जेदार परीक्षण आणि सर्वोत्तम स्पर्धास्थळ यामुळे ही स्पर्धा नाट्यरसिकांच्या गळ्यातील ताईत बनली.

या महाअंतिम फेरीच्या अनुषंगाने नाट्य एकांकिकांचा रसिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, मंडळाचे उपाध्यक्ष अरुणशेठ भगत, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे उपाध्यक्ष व स्पर्धा प्रमुख परेश ठाकूर, सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. पाटील आणि टीम अटल करंडक यांनी केले आहे.

अंतिम फेरीच्या शेवटच्या दिवशी म्हणजेच रविवारी सकाळी ९ वाजल्यापासून उर्वरित एकांकिकांचे सादरीकरण होणार आहे. त्यानंतर पारितोषिक वितरण सोहळा होईल.

## मुरुडमध्ये राम नामाचा जयघोष

**मुरुड :** अयोध्येत श्रीरामाच्या मंदिराला आज वर्ष पूर्ण झाले या निमित्तेय सकल हिंदू समाजातर्फे विविध धार्मिक व शोभायात्रेचे आयोजन करण्याचे आवाहन करण्यात आले होते. या आवाहनाला मुरूड शहरांसह पंचक्रोशी भागातील नागरिकांनी सकाळपासून घरात, मंदिरात, नाक्या नाक्यावर नामजप, पूजन, भजन, पठण, ग्रंथ वाचन दुपारच्या दरम्यान श्रीरामाची महाआरती करण्यात आली. या वेळी डॉ.राज कल्याणी, डॉ. सुनील पटेल, गौरव हनुमंते, सिध्देश करंबे, सुधीर सिंग, भरत जैन, साईराज बाथम, अवलिक पटेल, राजु सांगवी, उमेश गोबरे, नेहा पटेल, वृषाली बातमी, भावेश शहा आदी उपस्थित होते.

# पनवेल शहरामध्ये नागरिकांना रेशन मिळण्याची व्यवस्था करा

## दर्शना भोईर यांची तहसीलदारांकडे मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहर परिसरामध्ये नागरिकांना रेशन मिळण्याची व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी माजी नगरसेविका दर्शना भोईर यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी पनवेल तहसीलदारांकडे निवेदन दिले आहे.

भोईर यांनी निवेदनात म्हटले आहे की, पनवेल शहरातील रेशन मिळणारे दुकान क्र. १५ पाण्याच्या टाकीजवळ व व दुकान क्र.३ गणेश मार्केटजवळ स्थलांतरीत करण्यात आलेले होते त्यानंतर हे दुकान पनवेल शहरामध्ये स्थलांतरीत करण्याबाबत



आपणाकडे पत्र सादर केल्यानंतर सध्या हे दुकान खांदा गावात स्थलांतरीत केलेली आहे. हे दुकान महिन्यातून एकच दिवस सुरू असल्याने व नागरिकांना त्या ठिकाणाहून रेशन आणण्यास गैरसोयीचे होत असल्याने या परिसरातील सर्व सामान्य नागरिकांना रेशनचा पुरवठा व्यवस्थित होत नाही. अनेकदा हेलपाटा मारावा लागतो. यामध्ये वेळ खर्च होतो व गैरसोयही होते. त्यामुळे खांदा गावातील रेशनचे दुकान पनवेल शहर परिसरात हलविण्यात यावे.

निवेदनादेतेवेळी दर्शना भोईर यांच्यासमवेत दत्ता पाटील, कमलाकर कोळी, रमेश भगत, धर्मा भगत, आकाश भगत, कोळी आदी उपस्थित होते.



### जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविणेत येत आहे की, मौजे-डोलघर, ता-पनवेल, जि-रायगड, येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तीच्या मालकी हक्काची, मिळकत वा जमीन ही आमचे आशिलांनी कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी, सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे :-

**- मिळकतीचे वर्णन-**

**मौजे: डोलघर, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड**

| गाव | भोगवटदारांचे नाव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे आर.पॉ. | आकाराणी रू.पै. |
|---|---|---|---|---|
| डोलघर | बेबीनंदा विनायक जोशी | ७०/३ | ०.२०.०० | ०.५९ |

सदरहू जागा, जामिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधीतांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजीत व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीच्या न येणा-या कोणत्याही हरकती/तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : ११/०१/२०२५**

**सही/-**
**ॲड. सुरेखा र. सागावकर**
**पत्ता-** शॉप नं. ०३,०४, श्री हरेकृष्णा को. ऑप. सोसायटी, प्लॉट नं. १२, प्लॉट नं. ५,सेक्टर-५, नवीन पनवेल, ४१०२०६

# पनवेल मनपा कार्यालयांमध्ये साफसफाई

## मुख्यमंत्र्यांच्या सात कलमी कृती कार्यक्रमानुसार कार्यवाही

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलेल्या सात कलमी कृती कार्यक्रमानुसार आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालय, प्रभाग समिती ड कार्यालय, कळंबोली प्रभाग समिती प्राथमिक आरोग्य केंद्र, भिंगारी येथील विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.





मुख्यमंत्र्यांनी विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त, पोलीस आयुक्त आणि पोलीस अधीक्षक यांच्याशी दुरदृष्य (व्हीसी) प्रणालीद्वारे संवाद साधून आपाआपल्या कार्यालयांमध्ये सात कलमी कार्यक्रम राबविण्यास सांगितले आहे. यानुसार आयुक्त मंगेश चितळे यांनी सर्व अधिकाऱ्यांची नुकतीच मुख्यालयात बैठक घेऊन सात कलमी कृती कार्यक्रम राबविण्याबाबत आदेश दिले आहेत.

या वेळी अतिरिक्त आयुक्त प्रशांत रसाळ, उपायुक्त कैलास गावडे, डॉ. वैभव विधाते, बाबासाहेब राजळे, प्रसेनजित कारलेकर, रविकिरण घोडके, शहर अभियंता संजय कटेकर, सहायक आयुक्त स्मिता कळे, श्रीराम पवार, रुपाली माने, सुबोध ठाणेकर तसेच प्रभाग अधिकारी, अधिकारी उपस्थित होते. त्यानुसार प्रामुख्याने महापालिकेची सर्व कार्यालये परिसर साफसफाई व सौंदर्यीकरण, फर्निचर दुरुस्ती तसेच स्वच्छतेच्या दृष्टिने स्वच्छता मोहीम घेण्याबाबत आदेशात करण्यात आले आहे. तसेच पनवेल महानगरपालिका हद्दीमध्ये सदर स्वच्छता मोहिमेची अंमलबजावणी करणेकामी निर्देशित करण्यात आले आहे.

यानुसार आज पनवेल महापालिकेच्या मुख्यालयात स्वच्छता मोहीम घेऊन तेथील खुप दिवसांपासुन पडून असलेले व वापरात नसलेले कपाटे,खुर्च्या फर्निचर इत्यादी साहित्य निष्कासित करण्यात आले. तसेच प्रभाग समिती ड कार्यालय, प्राथमिक आरोग्य केंद्र, भिंगारी कार्यालयांमध्ये विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या स्वच्छता मोहीमेमध्ये अनावश्यक कागदपत्रे काढून टाकण्यात आली. तसेच प्रभाग १० कळंबोली प्रभाग कार्यालय येथे मुख्य आरोग्य निरीक्षक अरुण कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता मोहीम घेण्यात आली.

या वेळी कार्यालयांच्या मागील भाग, संपूर्ण प्रभाग कार्यालय बाथरूम जीना साफ सफाई व पाण्यानी धुऊन व पुसून घेण्यात आले. याचबरोबर वापरात नसलेली वाहने निर्लेखित करण्यात येणार आहेत. याबरोबरच राहिलेल्या कार्यालयांमध्ये येत्या काही दिवसांत स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे. तसेच सात कलमी कृती कार्यक्रमांतर्गत इतर कार्यक्रम राबविण्यावरती भर देण्यात येणार आहे.

## विनातिकीट महिला प्रवाशाची टीसीला मारहाण

**पनवेल : वार्ताहर**

विनातिकट रेल्वेने प्रवास करणाऱ्या महिलेकडे तिकीटाबाबत विचारणा केल्याने संतप्त झालेल्या महिलेने, महिला टीसीचे केस पकडून मारहाण तिला बेदम मारहाण केल्याची घटना पनवेल रेल्वे स्थानकात घडली. सुषमा खेमका असे या महिला टीसीला मारहाण करणाऱ्या महिलेचे नाव असून पनवेल रेल्वे पोलिसांनी तिच्याविरोधात सरकारी कामात अडथळा आणून शिवीगाळ आणि मारहाण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणातील ३८ वर्षीय तक्रारदार महिला तिकीट तपासणीस या पनवेल रेल्वे स्टेशन येथे वरिष्ठ तिकीट निरीक्षक म्हणून कार्यरत आहेत. त्या आणि त्यांच्या सहकारी तिकीट तपासणीस फलाट क्रं.५ वर आलेल्या रोहा-दिवा मेमो रेल्वे गाडीतून उतरलेल्या प्रवाशांचे तिकीट तपासत होत्या. या वेळी महिला टीसीने २ महिलांकडे तिकीटाबाबत विचारणा केली असता, त्यातील आरोपी महिलेने तिच्याकडे तिकीट नसल्याचे सांगून तेथून पळून जाण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे महिला टीसीने तिला अडवण्याचा प्रयत्न केला असता, सदर महिलेने महिला टीसीला शिवीगाळ करून त्यांच्या हाताला नखाने ओरखडून त्यांना विरोध केला. त्यामुळे या महिला टीसीने इतर महिला टीसींच्या मदतीने महिलेला टीसी ऑफिसमध्ये नेल्यानंतर तिने महिला टीसीला अश्लिल शिवीगाळ करून त्यांचे केस पकडत त्यांना मारहाण करण्यास तसेच मोठमोठ्याने आरडा-ओरड करण्यास सुरुवात केली. त्यामुळे इतर महिला टीसींनी तेथे आरपीएफ जवानांना पाचारण केले.

या वेळी आरपीएफच्या महिला जवानांनी सदर महिलेला शांत करण्याचा प्रयत्न केल्यानंतरदेखील तीने टीसी ऑफिसमधुन बाहेर येऊन महिला टीसीचे केस पकडून मारहाण करत महिला टीसीच्या पोटामध्ये लाथ मारली. या वेळी आरपीएफने महिलेच्या तावडीतून सुटका केल्यानंतर महिला टीसीने पनवेल रेल्वे पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार दाखल केली.



उरण : भाजप तालुका उपाध्यक्ष मुकुंद गावंड यांच्याकडून छापण्यात आलेल्या टी शर्टचे अनावरण आमदार महेश बालदी यांच्या हस्ते शनिवारी झाले. या वेळी तालुकाध्यक्ष रवी भोईर, शहराध्यक्ष कौशिक शाह, माजी जि. प.सदस्य जीवन गावंड, दिघाटी ग्रामपंचायत माजी सरपंच अमित पाटील, पिरकोनचे माजी सरपंच के.वाय. गावंड, ओबीसी सेल सचिव प्रमोद म्हात्रे, प्रभाकर गावंड आदी उपस्थित होते.

## 'सीकेटी'च्या जान्हवी हातमोडेला राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

### आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून अभिनंदन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनी येथील सीकेटी महाविद्यालयातील तृतीय वर्ष कला शाखेतील विद्यार्थिनी जान्हवी ज्योती भास्कर हातमोडे हिला भारत, थायलंड, नेपाळ, श्रीलंका आणि अमेरिकेत कार्य करणाऱ्या प्रसिध्द मनुष्यबळ विकास लोकसेवा अकादमीतर्फे सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल राज्यस्तरीय आदर्श युवा महाराष्ट्र युथ आयडॉल पुरस्कार २०२५ जाहीर झाला आहे.



पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य तथा आमदार प्रशांत ठाकूर साहेब तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ. एस.के. पाटील यांनी जान्हवी हातमोडे हिचा यथोचित सत्कार केला.

या वेळी महाविद्यालयातील प्रो.डॉ. बी.व्ही. जाधव, प्रो.डॉ. बी.डी. आघाव, प्रो.डॉ. बी.एस. पाटील, डॉ.आर.ओ. परमार, डॉ.आर.व्ही.येवले, प्रा.सत्यजित कांबळे, प्रा. आकाश पाटील, प्रा. रुपाली पाटील आदी उपस्थित होते. जान्हवी हि २०२३-२४ या वर्षी एस.वाय.बी.ए. या वर्गात महाविद्यालयात द्वितीय आलेली असून ती जनरल सेक्रेटरी, एनएसएस, प्रज्ञा परिसर, अविष्कार, रोटरॅक्ट क्लब, कार्यक्रम संचालक, इलेक्टोरल लिटरसी ब्रँड ॲम्बॅसीटर या क्षेत्रात तिने कामगिरी केलेली आहे.

जान्हवीया राज्यस्तरीय पुरस्काराबद्दल संस्थचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, सचिव व माजी प्राचार्य डॉ. एस.टी. गडदे यांनी अभिनंदन शुभेच्छा दिल्या आहेत.

## सीकेटी इंग्रजी माध्यमिक विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन रंगले

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र, भारतातील एक समृद्ध सांस्कृतिक वारसा म्हणून ओळखले जाणारे राज्य. प्राचीन परंपरांना आधुनिक जीवनाशी जोडणारे राज्य. महाराष्ट्राची संस्कृती आणि परंपरेत अद्वितीय कला, उत्सव, खाद्यपदार्थ आणि साहित्य यांचा समावेश होतो. या संस्कृती आणि परंपरांना उजाळा देण्यासाठी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी) इंग्रजी माध्यमिक विद्यालय, नवीन पनवेल येथे ३१वे वार्षिक स्नेहसंमेलन (दि. १०) मोठ्या उत्साहात आणि दिमाखात साजरे झाले.





या स्नेहसंमेलनासाठी समारंभाचे अध्यक्ष म्हणून अमोघ प्रशांत ठाकूर, मुख्य अतिथी डॉ. रविकांत झाला, विशेष अतिथी माजी महापौर कविता चौतमोल, माजी नगरसेवक प्रकाश बिणेदार, विद्यालयाचा माजी विद्यार्थी डॉक्टर निखिल गवते, IWSA, Vashi च्या अध्यक्षा नूतन भाकल, संस्थेचे सचिव डॉक्टर एस. टी.गडदे सर, कुलकर्णी सर, तसेच सीकेटी संकुलातील सर्व प्राचार्य, मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, विभाग प्रमुख, इत्यादी पाहुण्यांची उपस्थिती लाभली.

विद्यालयातील संगीत शिक्षक रुपेश मढवी व तबला वादक संतोष खरे व विद्यार्थी गायक वृंद यांनी इशस्तवन, स्वागतगीत व रज्यागीत गाऊन मान्यवरांचे स्वागत केले. विद्यालयतर्फे मुख्याध्यापक संतोष चव्हाण आणि पर्यवेक्षिका नीरजा अदुरी यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत केले.

सांस्कृतिक विभागाच्या प्रमुख प्राची इसे यांनी कार्यक्रमाचे मुख्य अतिथी व कार्यक्रमाचे अध्यक्ष तसेच विशेष अतिथी व मंचावरील सर्व उपस्थित मान्यवरांचा परिचय करून दिला. विद्यालयाच्या वार्षिक अहवालाचे प्रकाशन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी विद्यालयाचा वाढत्या प्रगतीचा आलेख आपल्या प्रास्ताविकातून सादर केला. मुख्य अतिथी डॉ. रविकांत झाला यांनी शाळा ही एक उत्कृष्ट समाज घडवणारी संस्था आहे जी विद्यार्थ्यांना समाजामध्ये कसे वावरावे, आपण समाजाचे किती ऋणी आहोत, याची जाणीव करून देते. कार्यक्रमासाठी पाहुणे म्हणून बोलवल्याबद्दल त्यांनी संस्थेचे आभार मानले.

दुसऱ्या विशेष अतिथी डॉ. नूतन भाकल, इंडियन वुमन सायंटिस्ट असोसिएशनच्या अध्यक्षा नूतन भाकल यांनी आपल्या भाषणात सांगितले की, आज स्त्रियांना विज्ञानाची माहिती असणे किती आवश्यक आहे आणि स्त्रिया विज्ञानामध्ये किती पुढे आहेत याबद्दलचा आढावा घेतला. तसेच त्यांच्या संस्थेमार्फत चालवल्या जाणाऱ्या मुलींसाठी विज्ञानाबद्दलचे काही शिबिर, काही छोटे कोर्सेस यांची माहिती दिली तसेच अद्ययावत सोयी उपलब्ध करून देण्यात येत असल्याचे सांगितले.

विद्यालयाच्या स्नेहसंमेलन व वार्षिक पारितोषिक वितरण सोहळ्याचे अध्यक्ष अमोघ ठाकूर यांनी विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक केले तसेच विद्यार्थ्यांनी आपल्या आयुष्यात सतत पुढे जात राहिले पाहिजे त्यासाठी विविध सहशालेय उपक्रमात नेहमी सहभाग घेतला पाहिजे, असे सांगितले तसेच विद्यालयाच्या भावी यशस्वी वारसा चालू ठेवण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमात विविध शैक्षणिक क्षेत्रात प्राविण्य प्राप्त सर्व विद्यार्थी, तसेच राज्य जिल्हा तालुका स्तरावरील प्रथम क्रमांक प्राप्त केलेले विद्यार्थी, बाह्य स्पर्धांमध्ये प्राविण्य प्राप्त केलेले विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना पाहुण्यांच्या हस्ते प्रशंसा प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. विद्यालयाच्या पर्यवेक्षिका तसेच मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनादेखील सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

## सुशोभित उमरोली शाळेचे उद्घाटन









**पनवेल : रामप्रहर वृत्त**

इनरव्हील क्लब ऑफ पनवेलतर्फे उमरोलीतील रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेचे सुशोभीकरण आणि दुरुस्ती करण्यात आली आहे. याचे उद्घाटन क्लबच्या विभागीय अध्यक्ष डॉ. शोभना पालेकर यांच्या हस्ते शुक्रवारी (दि.११) झाले.

इनरव्हील क्लब ऑफ पनवेलच्या वतीने विविध सामाजिक आणि शैक्षणिक उपक्रम सातत्याने राबवले जातात. त्यानुसार क्लबकडून उमरोलीतील रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेच्या कंपाऊंड वॉलचे आतून बाहेरून रंगकाम, शौचालयाची दुरुस्ती, शुद्ध पाण्यासाठी वॉटर फिल्टर, हात धुवण्यासाठी हॅन्डवॉश स्टेशन, शाळेसाठी पाच खुर्च्या तसेच मुलांना खेण्यासाठी खेळाचे साहित्य देण्यात आले आहे. याचे उद्घाटन इनरव्हील क्लब ऑफ पनवेलच्या विभागीय अध्यक्ष शोभना पालेकर यांच्या हस्ते तसेच अध्यक्ष वीणा मनोहर आणि वर्षा ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

या वेळी उमरोली गावच्या सरपंच श्वेता माळी, माजी सरपंच शुभांगी मढवी, मुख्याध्यापक नितीन माळीपरगे यांच्यासह क्लबच्या सदस्य तसेच मान्यवर उपस्थित होते.

## इस्कॉन मंदिर लोकार्पण सोहळा सुरू

**पनवेल : वार्ताहर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लोकार्पण होणाऱ्या व खारघर उपनगराच्या वैभवात अध्यात्माची भर घालणारे इस्कॉन श्री राधाकृष्ण भव्य मंदिराच्या लोकार्पण सोहळ्याला गुरुवारपासून सुरुवात झाली. भाविकांनी होम व यज्ञ होत असलेल्या ठिकाणी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

९ ते १५ जानेवारी या कालावधीत मंदिरामध्ये विविध होम, यज्ञ, भजनाचे कार्यक्रम होणार आहेत. १४ जानेवारीला प्राणप्रतिष्ठेनंतर १५ जानेवारीला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मंदिराचा लोकार्पण सोहळा केला जाणार आहे. खारघर उपनगरातील सेंट्रलपार्क उद्यानाला खेटून असलेल्या ९ एकर जागेवर हे मंदिर बांधले आहे. अनेक वर्षे या मंदिराचे बांधकाम सुरू होते.

गुरुवारी सकाळी आठ वाजल्यापासून मंदिर परिसरात विविध कार्यक्रम सुरू झाले. यामध्ये विशेष भागवत वर्ग, होम, यज्ञ शाळा प्रवेश, कलशाची स्थापना आदि कार्यक्रमांचा समावेश होता. मंदिराच्या परिसरात गोशाळा, सेंद्रीयशेती, स्मारक, वैदिक शिक्षणाचे वर्ग, वैदिक पुस्तकांचे संग्रहालय, आयुर्वेदीय उपचार केंद्र, ब्रम्हचारी आश्रम, सभागृह, स्वयंपाक घर, इस्कॉन युवा मंच असे विविध उपक्रम राबविले जाणार आहेत.

## स्टॉक मार्केट विषयावर कॉलेजमध्ये मार्गदर्शन

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात उद्योजकता विकास समितीतर्फे शनिवारी (दि.११) स्टॉक मार्केटवर मार्गदर्शनपर सत्राचे आयोजन केले होते.

या सत्रामध्ये शुभम सुमन (असिस्टंट मॅनेजर मोतीलाल ओसवाल प्रायव्हेट लिमिटेड फायनान्शियल एलटीडी) यांनी महाविद्यालयातील वाणिज्य शाखेतील प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांना स्टॉक मार्केटविषयी मोलाचे मार्गदर्शन केले. महाविद्यालयातील सुमारे १०० विद्यार्थ्यांनी या सत्राचा लाभ घेतला. या सत्राचा मुख्य हेतू विद्यार्थ्यांना स्टॉक मार्केट विषयी माहिती व्हावी तसेच भविष्यामध्ये एक चांगला इन्वेस्टर म्हणून वेगवेगळ्या ठिकाणी गुंतवणूक करण्यासाठी हा होता.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी हा शैक्षणिक उपक्रम यशस्वीरित्या घेतल्याबद्दल आयोजकांचे अभिनंदन केले व पुढील उपक्रमांसाठी शुभेच्छा दिल्या. या सत्राचे आयोजन प्रा. तनुजा सुमन यांनी केले तसेच उद्योजकता विकास समितीतील इतर सर्व सदस्य तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.



# वराठी ग्रामपंचायत अधिकारी निलंबित

## मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांची कारवाई

**अलिबाग : प्रतिनिधी**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जनतेला सोयीसुविधा मिळाव्यात या अनुषंगाने १०० दिवसांचा महत्त्वाकांक्षी उपक्रम जाहीर केला आहे. या उपक्रमाची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत असून प्रत्येक तालुकानिहाय आढावा घेण्यात येत आहे तसेच कामचुकार करणाऱ्या अधिकाऱ्यांविरोधात कारवाईचा बडगा उगारला जात आहे. महाड, पोलादपूर तालुक्यातील ग्रामपंचायत अधिकारी यांच्या आढावा शुक्रवारी (दि.१०) आयोजित केलेल्या बैठकीत घेण्यात आला. या बैठकीला गैरहजर राहणारे वराठी ग्रामपंचायत अधिकारी मोतिसिंग लहानु भस्मे यांना जिल्हा परिषदेचे



मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी निलंबित केले आहे.

बैठकीला विनापरवानगी गैरहजर राहण्यासोबत भस्मे यांनी १५वा वित्त आयोगाचा खर्च कमी करणे, प्रधानमंत्री आवास योजना कामात जाणून बुजुन दुर्लक्ष केल्याने ही कारवाई करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १०० दिवसांचा महत्वाकांक्षी उपक्रम जाहीर केला आहे. या उपक्रमांतर्गत शंभर दिवसांत नागरिकांच्या सोयीसुविधा, प्रशासनातील सुधारणा या बाबींवर भर दिला जात आहे. उपक्रमांतर्गत शुक्रवारी (दि.१०) महाड, पोलादपुर तालुक्यातील ग्रामपंचायत अधिकारी यांची आढावा सभा घेण्यात आली. या सभेमध्ये प्रधानमंत्री आवास योजना, १५वा वित्त आयोग १०० टक्के खर्च करणे, स्वच्छ भारत अभियानातंर्गत करण्यात आलेली कामे यांचा आढावा घेण्यात आला. या वेळी १०० दिवसांचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम विहीत वेळेपूर्वी यशस्वी करणे व त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या सूचना डॉ. भरत बास्टेवाड यांनी उपस्थित ग्रामपंचायत अधिकारी यांना दिल्या.

या आढावा सभेस महाड तालुक्यातील वराठी ग्रामपंचायत अधिकारी मोतिसिंग भस्मे हे विनापरवानगी गैरहजर राहिले होते तसेच त्यांनी १५वा वित्त आयोगाचा खर्च कमी करणे, प्रधानमंत्री आवास योजना कामात जाणूनबुजून दुर्लक्ष केल्याचे निदर्शनास आल्याने भस्मे यांना निलंबित करण्यात आले आहे.

आढावा सभेस जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे, ग्रामपंचायत विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भालेराव, मुख्य लेखा व वित्त अधिकारी राहुल कदम, महाडच्या गटविकास अधिकारी डॉ. स्मिता पाटील, पोलादपूरच्या गटविकास अधिकारी दिप्ती गाट, सहाय्यक गटविकास अधिकारी नामदेव आण्णा कटरे तसेच सर्व विस्तार अधिकारी, शाखा अभियंता उपस्थित होते.

# रा.जि.प. सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेचा जिल्हा मेळावा





**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद सेवानिवृत्त कर्मचारी संघटना रायगडचा पहिला जिल्हा मेळावा बुधवारी (दि. ८) क्षात्रैक्य समाज हॉल, कुरुळ, अलिबाग येथे रा.जि.प. कर्मचारी संघटना रायगड जिल्हा शाखेचे माजी अध्यक्ष सखाराम पवार यांच्या अध्यक्षतेखाली व क्षात्रैक्य समाज अलिबागचे अध्यक्ष द्वारकानाथ नाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात झाला.

या मेळाव्यास रा.जि.प.चे उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी महादेव टेले, लेखाधिकारी सतीश भोळवे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. याशिवाय व्यासपीठावर जिल्हा परिषद सेवा निवृत्त कर्मचारी संघटना अध्यक्ष जी.एच. पाटील, उपाध्यक्ष अजित जाधव, डी.जी. मानकर, सचिव सुरेश म्हात्रे, खजिनदार किशोर घरत, सदानंद शिर्के, राजिप कर्मचारी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष डॉ. कैलास चौलकर, माजी अध्यक्ष प्रकाश नागू म्हात्रे, डॉ. राजू म्हात्रे, न.मो. घरत, आय. के. दळवी, ए.बी. पाटील, मदन मोरे, नामदेव शिंदे, प्रकाश म्हात्रे, डॉ. रवींद्र पाटील, सुचिता पाटील, सुनील पाटील, सदानंद शेळके, नाट्यचित्रपट अभिनेते शरद कोरडे, साप्ताहिक कोकणनामाचे संपादक उमाजी केळुसकर आदी उपस्थित होते.

या वेळी सखाराम पवार यांनी अध्यक्षस्थानावरून बोलताना जुन्या आठवणींना उजाळा दिला. ८० वर्षे पूर्ण सेवानिवृत्त झालेले सखाराम पवार, द्वारकानाथ नाईक, दत्तात्रय मुकादम, सदानंद इकर, श्रीकांत पाटील, दोडाचार्य व्यकंटाचार्य, नारायण भगत, रमेश वाकडे, आत्माराम पाटील, हरिश्चंद्र पाटील, वामन बने, रामचंद्र डाके, तुळशीदास मोरजकर, कृष्णकांत मोरजकर, साधा फाटक, कुसुम पाटील, शरद गडेकर, गोविंद पवार, पांडुरंग राऊळ, शशिकांत पाटील, बाबुराव देशमुख, अशोक सावंत, तुकाराम म्हात्रे, नारायण म्हात्रे, प्रकाश लोखंडे, विश्वनाथ पाटील, रामचंद्र लाड, शिवाजी खानविलकर यांचा या मेळाव्यात सत्कार करण्यात आला.

प्रारंभी राजेंद्र म्हात्रे, ऋग्वेद म्हात्रे यांनी ईशस्तवन, महाराष्ट्र गीत सादर केले. सूत्रसंचालन अमरदीप ठोंबरे यांनी केले. आभार खजिनदार किशोर म्हात्रे यांनी मानले. पसायदानाने मेळाव्याची सांगता झाली. या मेळाव्यासाठी रायगड जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातून राजिपचे सेवानिवृत्त कर्मचारी उपस्थित होते.

रायगड जिल्हा परिषदेतील जे सेवानिवृत्त कर्मचारी आहेत त्यांच्या मागण्यांची पूर्तता करण्याच्या दृष्टीने पावले उचलली जात आहेत. महिन्याच्या १ तारखेस निवृत्तीवेतन मिळण्यासाठी सॉफ्टवेअर विकसित करण्यात आले असून ते लवकर सुरू होईल, अशी माहिती रायगड जिल्हा परिषदेचे उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी महादेव टेले यांनी या वेळी दिली.

# शाळा परिवहन समित्यांना वाहन निरीक्षकांचे मार्गदर्शन



**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये शिक्षण घेण्यासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना ने-आण करणाऱ्या स्कूल बस तथा व्हॅन तसेच अन्य वाहनांनी संबंधित असलेल्या विविध शाळांतील परिवहन समित्यांना रायगड जिल्ह्यातील पेण येथील मुख्य रस्ता वाहतूक कार्यालयाचे मोटार वाहन निरीक्षक अनिस बागवान यांची बुधवारी मार्गदर्शन केले.

मुरूडच्या अंजुमन इस्लाम हायस्कूलमध्ये झालेल्या सभेत त्यांनी सभेला उपस्थित विविध शाळांचे मुख्याध्यापक, वाहतूक ठेकेदार, वाहन चालक तथा परिवहन समिती अध्यक्ष, सदस्य आदींना बागवान यांनी मार्गदर्शन केले.

या वेळी सहायक मोटार वाहन निरीक्षक अमर शेट्ये, दिनेश ढोकणे उपस्थित होते.

बस चालकांनी बसच्या वेगावर मर्यादा ठेवावी. प्रत्येक गाडीवर क्लीनर ठेवणे गरजेचे आहे. विद्यार्थी गाडीत चढताना आणि उतरताना सावधानता बाळगणे अशा एकूण अठ्ठावीस नियमांचे वाचन करून त्यांचे पालन करण्याच्या सूचना त्यांनी या वेळी उपस्थितांना दिल्या.

# व्यवहार्यता तपासून रेल्वेगाडीला थांबा

**कर्जत : प्रतिनिधी**

प्रगती एक्सप्रेस व डेक्कन एक्सप्रेस या गाडीच्या दरम्यान पुण्याहून कर्जतला येण्याकरिता एकही गाडी नसल्यामुळे कर्जतच्या प्रवासींनी पुण्याहून कर्जतला यायचे कसे, असा प्रश्न कर्जतकरांच्या समस्येविषयी पंकज ओसवाल यांनी रेल्वे प्रशासनाकडे उपस्थित केला आहे. यावर कर्जत रेल्वेस्थानकावर गाड्यांच्या थांब्याच्या तरतुदीची व्यवहार्यता तपासल्यानंतर थांब्याचा विचार केला जाईल, असे रेल्वे प्रशासनास लेखी कळविले आहे.

रेल्वे प्रशासनाने या बाबतीत व्यावसायिक समर्थनाच्या आधारे कर्जत रेल्वेस्थानकावर गाड्यांच्या थांब्याच्या तरतुदीची व्यवहार्यता तपासून लवकरात लवकर कर्जत रेल्वेस्थानकात बंद केलेल्या गाड्यांचा थांबा द्यावा, अशी मागणी पंकज ओसवाल यांनी केली आहे.

# कारखान्यांविरोधात ग्रामस्थ आक्रमक

## प्रदूषण नियंत्रण मंडळासोबत चर्चा करणार -आमदार महेश बालदी

**रसायनी : रामप्रहर वृत्त**

रॉयल कार्बन ब्लॅक कंपनी प्रा.लि. आणि फिंन्स्टर ब्लॅक प्रा.लि. या दोन प्रदूषण निर्माण करणाऱ्या कंपन्यांविरोधात वयाळ ग्रामस्थांनी शनिवारी (दि.११) उरण विधानसभेचे आमदार महेश बालदी यांना निवेदन दिले आहे. त्यांनी या वेळी येत्या १० ते १५ दिवसांमध्ये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन समस्या मार्गी लावण्याचे आश्वासन दिले.



खालापूर तालुक्यात वानिवली गावाजवळ हे दोन कारखाने आहेत. येथे टायर पायरॉलीसीस ही प्रक्रिया केली जाते. यातून निर्माण होणारा कार्बन हवेत पसरून या परिसरात भयंकर प्रदूषण निर्माण होत असल्याची तक्रार वयाळ ग्रामस्थांनी प्रदूषण मंडळ, खालापूर तहसीलदार, वरीष्ठ पोलीस निरीक्षक खालापूर, रसायनी, उपविभागीय अधिकारी कर्जत यांना लेखी पत्र दिले आहे. येथे घरावर, झाडांवर आणि माणसांच्या अंगावर कार्बनचे कर्ण पडत आहेत. गेली काही वर्षे येथील आंब्याच्या झाडाला मोहरदेखील आला नसून श्वसन आणि खोकल्याचा भयंकर त्रास सुरू आहे. तसेच कोणती वस्तु घराच्या बाहेर ठेवणे अवघड झाले आहे. कपडे सुकत घालण्यापासून वाळवणदेखील घरा बाहेर ठेवता येत नाही.

या कारखान्यांचे प्रदूषित पाणीदेखील नदीत सोडले जाते पुर्वी या नदीचे पाणी ग्रामस्थ वापरत होते. आज मुकी जनावरे देखील पाणी पित नसल्याने त्यांचीही वणवण सुरू आहे. हे होणारे प्रदूषण रोखण्यासाठी या दोन्ही कंपन्या कोणतीही उपाय योजना करण्यास तयार नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. कंपनीने कायमस्वरुपी उपाययोजना न केल्यास हे कारखाने हटविण्यासाठी ग्रामस्थांना तीव्र आंदोलन करावे लागेल, असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

निवेदना घेतेवेळी आमदार महेश बालदी यांनी सांगितले की, येत्या १० ते १५ दिवसांमध्ये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ अधिकाऱ्यांबरोबर मिटिंग घेऊन तत्काळ प्रश्न मार्गी लावू आणि नाही झाले तर पुढील अधिवेशनात ग्रामस्थांची असलेली तीव्र समस्या मांडू, असे आश्वासन दिले.

# जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा

**खोपोली : प्रतिनिधी**

प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधत येथील स्वराज्य मित्र मंडळाने जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले आहे. मंडळाचे हे १६ वे वर्ष आहे.

स्पर्धा चार गटात घेण्यात येणार आहे. पहिली ते चौथी गटात माझी शाळा, झाशीची राणी लक्ष्मीबाई, मला हवेत आजी आजोबा, सणाचे महत्त्व; पाचवी ते सातवी गटात ज्ञानाचे प्रतीक डॉ. बाबासाहेब आंबेडकर, माझ्या स्वप्नातील भारत, पुस्तके अनमोल ठेवा, मोबाईल माझा मित्र; आठवी ते दहावी गटात शिवचरित्र जगण्याची संहिता, व्यसन सोशल मीडियाचे, जीवन सुंदर आहे व मित्र वणव्यामध्ये गारव्यासारखे; तर खुल्या गटात भारतीय संविधानाचा अमृत महोत्सव, रील स्टारपेक्षा रियल स्टारची गरज असे विषय आहेत. विजेत्यांना रोख रक्कम व प्रमाणपत्र देण्यात येईल. अधिक माहितीसाठी ८१४९९०७६७५, ९८२३५१८८५७ या क्रमांकावर संपर्क साधावा.

# स्व. प्रभावती कळमकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सीसीटीव्ही कॅमेरा भेट

**खोपोली, मोहोपाडा : प्रतिनिधी**

स्व. प्रभावती मधुकर कळमकर यांच्या प्रथम स्मृतीदिनानिमित्त दिलासा फाउंडेशन आणि रायगड मावळ पत्रकार संघाचे अध्यक्ष मनोज कळमकर यांनी खालापूर पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्याकडे सीसीटीव्ही कॅमेरा सुपूर्द केला.



खालापूर शहर हे तालुक्याचे ठिकाण असून येथे दररोज शेकडो नागरिक कामानिमित्ताने येत असतात. खालापूर बसस्थानकात सीसीटीव्ही कॅमेरा नसल्याने या ठिकाणी मद्यपी, टवाळखोर यांचा मुक्त वावर असतो. सकाळी लवकर शाळा-महाविद्यालयात जाणाऱ्या विद्यार्थिनींना तसेच रात्री उशिरा कामावरून सुटल्यानंतर घरी परतणाऱ्या महिलांना बसस्थानकात असुरक्षित वाटत असल्याने प्रवासी तसेच बसस्थानकातील व्यापाऱ्यांनी सीसीटीव्ही कॅमेरा बसवावा, अशी मागणी केली होती.

सामाजिक उत्तरदायित्व या भावनेतून कळमकर कुटुंबानी त्यांच्या मातोश्रींच्या प्रथम स्मृतीदिनानिमित्ताने सीसीटीव्ही कॅमेरा भेट दिला असून हा कॅमेरा बसस्थानकात बसविण्यातदेखील आला आहे. सीसीटीव्ही कॅमेरा खालापूर पोलीस ठाण्यात भेट देतेवेळी खालापूर तालुका शिक्षण प्रसारक विधी महाविद्यालयाचे अध्यक्ष नरेंद्र शहा, नगराध्यक्ष रोशना मोडवे, ज्येष्ठ पत्रकार विकी भालेराव, प्रसाद अटक, दीपक जगताप, सपोनी प्रकाश वाढवे, सामाजिक कार्यकर्ते संतोष खालापूरकर, निवास चौधरी, गणेश साळुंखे, सचिन पारठे, मोहन दिनकर उपस्थित होते.

> **अतिशय स्तुत्य उपक्रम असून बसस्थानकात सीसीटीव्ही कॅमेरा गरजेचा होता. सीसीटीव्ही कॅमेरा प्रक्षेपण खालापूर पोलीस ठाण्यातून पाहता येईल अशी व्यवस्था करण्यात येईल.**
>
> **-सचिन पवार, पोलीस निरीक्षक, खालापूर**

# देशमुख कांबळे येथे शेत शिवार फेरी, शेतकरी मेळावा

**मुरुड : प्रतिनिधी**

किसान कांती संघटना, महाराष्ट्र राज्य व किसान फाऊंडेशन रायगड यांच्यामार्फत नुकतेच देशमुख कांबळे गावात शेत शिवार फेरी व शेतकरी मेळावा संघटनेचे अध्यक्ष टी. एस. देशमुख यांचे अध्यक्षतेखाली झाला. या कार्यक्रमास प्रमुख मागदर्शक म्हणून कृषी विज्ञान केंद्राचे विस्तार शास्त्रज्ञ डॉ. प्रमोद मांडवकर, तर प्रमुख पाहुणे म्हणून तालुका कृषी अधिकारी धीरज तोरणे, नामदेव कटरे उपस्थित होते.



सुरुवातीला प्रगतशील शेतकरी उमेश देशमुख यांच्या शेत शिवाराला सर्वांनी भेट दिली. या वेळी त्यांनी शेतात पिकविलेल्या भुईमूग, मटकी, वाल, मूग, चवळी इ. पिके व फळझाडांविषयी माहिती दिली. या पिकांची सद्यस्थिती व पुढील व्यवस्थापन या विषयी डॉ. प्रमोद मांडवकर व कृषी पर्यवेक्षक कोकरे यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले व शंकांचे निरसन केले.

शेतकरी मेळाव्याचे आयोजन माजी आमदार चंद्रकांत देशमुख सभागृह देशमुख कांबळे येथे करण्यात आले होते. उपस्थित मान्यवरांचे स्वागत संघटनेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, खजिनदार यांनी केले. यानंतर पंचायत समितीच्या विविध योजनांची माहिती नामदेव कटरे यांनी व कृषी विभागाच्या योजनांची माहिती कृषी पर्यवेक्षक कोकरे यांनी दिली. डॉ. प्रमोद मांडवकर यांनी एकात्मिक शेती पद्धती व समूह शेतीविषयी माहिती दिली. महाडच्या औद्योगिक पट्ट्यात शेतकरी मेळावा घेऊन शेतकऱ्यांना जागरूक ठेवण्याचे काम किसान कांती संघटना करत असल्याबद्दल संघटनेला धन्यवाद दिले. डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाने विकसित केलेले तंत्रज्ञान शेतकऱ्यांना आत्मसात करावे. त्याचप्रमाणे सर्व योजनांचा लाभ घेताना रोजगारभिमुख दृष्टीकोन ठेवावा, असे आवाहन केले. यानंतर धीरज तोरणे यांनी कृषी विभागाच्या योजना शेतकऱ्यांना फायदेशीर असून त्या राबविण्याचे आवाहन केले.

किसान क्रांती संघटनेचे उपाध्यक्ष श्रीधर जंजिरकर यांनी संघटनेच्या कार्याचा आढावा सादर केला.

अध्यक्षीय मार्गदर्शन करताना टी.एस. देशमुख यांनी शेतकरी संघटनेच्या माध्यमातून राज्यभर व जिल्ह्यात विविध कार्यक्रम, शेतकरी सत्कार सोहळा हे कार्यक्रम विविध शासकीय संस्था यांच्या सहकार्याने सुरू असल्याचे नमूद कले. शेतकरी आत्मनिर्भर झाला पाहिजे यासाठी कष्ट करण्याचे आवाहन उपस्थित शेतकऱ्यांना केले.

सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन संघटनेचे सचिव राजेंद्र जैतपाल यांनी केले. या उपक्रमा देशमुख कांबळे परिसरातील १५० शेतकरी सहभागी झाले होते.

# नागोठणे पत्रकार असोसिएशनचे पुरस्कार जाहीर

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे ग्रामीण विभाग पत्रकार असोसिएशनचा बारावा वर्धापन दिन सोहळा लवकरच साजरा होत असून पत्रकार असोसिशनकडून देण्यात येणारे विविध पत्रकार पुरस्कार बैठकीत जाहीर करण्यात आले आहेत.



पत्रकार असोसिएशनचा मानाचा पुरस्कार समजला जाणारा कै. तात्यासाहेब टके ज्येष्ठ पत्रकार पुरस्कार अलिबाग येथील साप्ताहिक कुलाबा वैभवचे संपादक बळवंत वालेकर यांना, उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार दै. पुढारीचे खालापूर येथील पत्रकार प्रशांत गोपाळे यांना, तर युवा पत्रकार पुरस्कार दै. पुण्यनगरीचे पनवेल येथील पत्रकार साहिल रेळकर यांना जाहीर करण्यात आला. याच बैठकीत नागोठणे शहर व ग्रामीण विभागासह जिल्ह्यात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येणार असल्याचे या वेळी ठरविण्यात आले.

नागोठणे ग्रामीण विभाग संघटनेचे मार्गदर्शक भाईसाहेब टके यांच्या प्रमुख उपस्थितीत घेण्यात आलेल्या या बैठकीला पत्रकार असोसिएशनचे संस्थापक शामकांत नेरपगार, अध्यक्ष ॲड. महेश पवार, सचिव अनिल पवार, उपाध्यक्ष सुनील कोकळे, सहसचिव राजेंद्र जोशी, सदस्य विनोद भोईर, दिनेश ठमके, चेतन टके, राजेश पिंपळे, सचिन नेरपगार आदी उपस्थित होते.

## विजय हजारे चषक स्पर्धा

# महाराष्ट्र संघ उपांत्य फेरीत



**बडोदा : वृत्तसंस्था**

ऋतुराज गायकवाडच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्र संघाने विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेच्या सेमी फायनलमध्ये एन्ट्री मारली आहे. बडोदा येथील कोटांबी स्टेडियमवर रंगलेल्या तिसऱ्या क्वार्टर फायनल लढतीत पंजाबविरुद्ध ७० धावांनी विजय नोंदवत महाराष्ट्राच्या संघाने सेमी फायनलमध्ये प्रवेश केला आहे.

पहिल्यांदा फलंदाजी करताना महाराष्ट्र संघाने अर्शिन कुलकर्णीच्या १०७ (१३७) शतकी खेळीनंतर अंकित बावने ६० (८५) आणि निखिल नाईक ५२ (२९) यांनी केलेल्या दमदार अर्धशतकाच्या जोरावर निर्धारित ५० षटकात संघाच्या धावफलकावर ६ बाद २७५ धावा लावल्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना पंजाबचा संघ २०५ धावांत गारद झाला.

२७६ धावांचा पाठलाग करताना मुकेश चौधरीने पंजाबच्या आघाडीच्या फळीतील फलंदाजीला सुरुंग लावला. प्रभसिमरन सिंग १४ (१७), अभिषेक शर्मा १९ (१६) आणि नेहाल वढेरा ६ (११) या तीन मॅच विनर खेळाडूंना मुकेशने आपल्या पहिल्या स्पेलमध्येच तंबूचा रस्ता दाखवला. त्याचा हाच स्पेल पंजाबला भारी पडला. त्याने दिलेल्या या तगड्या धक्क्यातून संघ काही सावरला नाही. अनमोलप्रित सिंग याने ७७ चेंडूत केलेल्या ४८ धावा आणि तळाच्या फलंदाजीत अर्शदीप सिंगने ३९ चेंडूत तीन चौकार आणि तीन षटकाराच्या मदतीने केलेली ४९ धावांची खेळी वगळता पंजाबच्या एकाही फलंदाजाला मोठी खेळी करता आली नाही. परिणामी संघाचा डाव ४४.४ षटकात २०५ धावांवर आटोपला.

१२ जानेवारीला विदर्भ विरुद्ध राजस्थान यांच्यात दुसरा क्वार्टर फायनल सामना रंगणार आहे. यांच्यातील विजेता सेमी फायनलमध्ये महाराष्ट्र संघाविरुद्ध खेळताना दिसेल.



## सीकेटी कॉलेजचा क्रीडा महोत्सव उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्टस्, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज (स्वायत्त) येथे वार्षिक क्रीडा महोत्सवाचे आयोजन ९ ते ११ जानेवारीदरम्यान आयोजन करण्यात आले होते. या तीन दिवसीय क्रीडा महोत्सवामध्ये महाविद्यालयातील तब्बल ३५०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

क्रीडा महोत्सवाच्या उद्घाटन समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून व्हीडीआयपीएलचे व्यवस्थापकीय संचालक वैभव देशमुख यांची उपस्थिती लाभली. या क्रीडा महोत्सवात रस्सीखेच, बॉल बॅडमिंटन, कबड्डी, खो-खो, कुस्ती, फुटबॉल, जुडो, बॉक्सिंग, कॅरम, चेस, धावणे, पुलप्स, व्हॉलीबॉल, रग्बी, शुटींग, तलवारबाजी, टेबल टेनिस, उंच उडी, लांब उडी, गोळाफेक, सूर्यनमस्कार अशा तब्बल २१ प्रकारच्या खेळांच्या स्पर्धा घेण्यात आल्या.

या वेळी संस्थेच्या विविध विद्यालय व महाविद्यालयांमधील क्रीडा शिक्षक व पंच यांची उपस्थिती लाभली. विविध स्पर्धांमध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावणाऱ्या खेळाडूंना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.के. पाटील यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

क्रीडा महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी जिमखाना विभागाचे चेअरमन डॉ. व्ही.बी. नाईक, सहसंचालक प्रा. अनिल नाक्ती, प्रा. प्रतिज्ञा पाटील, सर्व सदस्य तसेच विविध विभागांच्या प्राध्यापकांनी समिती प्रमुख म्हणून कामगिरी यशस्वीरित्या पार पडली. त्याचबरोबर शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



## मराठमोळा शुभम बांगलादेश प्रीमिअर लीगमध्ये

**ढाका : वृत्तसंस्था**

सध्या बांगलादेशमध्ये बीपीएल २०२५ (बांगलादेश प्रीमिअर लीग)चा हंगाम खेळला जात आहे. या स्पर्धेत भारताचा शुभम रांजणे खेळत आहे. तो या लीगमध्ये ढाका कॅपिटल्स संघाचे प्रतिनिधित्व करत आहे.

शुभम रांजणेचा क्रिकेटचा वारसा समृद्ध आहे. त्याचे आजोबा वसंत यांनी १९५८ ते १९६४ दरम्यान भारतासाठी सात कसोटी सामने खेळलेत. त्याचबरोबर त्यांचे वडील सुभाष यांनी २९ प्रथम श्रेणी आणि ११ लिस्ट ए सामन्यांमध्ये महाराष्ट्रासाठी प्रतिनिधित्व केले आहे. त्यांच्या पावलावर पाऊल ठेवत शुभमने महाराष्ट्रासाठी १२ प्रथम श्रेणी, २३ लिस्ट ए आणि २९ टी-२० सामने खेळले आहेत. तो अष्टपैलू खेळाडू असून खालच्या फळीतील उपयुक्त फलंदाज आहे. तसेच तो उजव्या हाताचा मध्यमगती गोलंदाजदेखील आहे.



## आशियाई मिक्स बॉक्सिंग स्पर्धेसाठी परी महाडिकची निवड

**रोहे : प्रतिनिधी**

दिल्ली येथे झालेल्या पाचव्या राष्ट्रीय मिक्स बॉक्सिंग चॅम्पियनशिप स्पर्धेत रोह्याची परी रूपेश महाडीक (मूळ गाव सर्वे, ता. मुरुड) चमकली असून तिने या स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले. त्यामुळे परीची नेपाळमध्ये होणाऱ्या स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तिने रोहा शहरासह तालुक्याचे व जिल्ह्याचे नाव उंचावल्याने सर्वत्र अभिनंदन होत आहे.

रोह्यातील भाटे सार्वजनिक वाचनालय येथे कराटे व मिक्स बॉक्सिंग प्रशिक्षण केंद्रात परी महाडिक ही मुख्य प्रशिक्षक विनायक सकपाळ, मुकेश भगत, सौरभ मेस्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेत आहे.

या यशाबद्दल मास्टर राकेश म्हसकर, प्रशांत मोहिते, विनायक सकपाळ, मुकेश भगत यांनी परीचे अभिनंदन केले असून तिच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत कुणाला मिळणार संधी?

### भारतीय संघात वरिष्ठ खेळाडूंच्या निवडीवर डोकेदुखी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

लोकेश राहुल, मोहम्मद शमी आणि रवींद्र जडेजा यांची १९ फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या आयसीसीच्या या प्रतिष्ठेच्या स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड निश्चित मानली जात नाही. हे तिघेही मागच्या वर्षी एकदिवसीय सामन्यांच्या विश्वचषक स्पर्धेत खेळले होते.



अंतिम सामन्यानंतर भारताने सहा एकदिवसीय सामने खेळले. त्यात जडेजा आणि शमी यांना विश्रांती देण्यात आली, मात्र राहुल हा दक्षिण आफ्रिका तसेच श्रीलंकेविरुद्ध मालिकांमध्ये खेळला. राहुलला लंकेविरुद्ध मालिकेच्या मध्येच बाहेर करण्यात आले होते. १९ नोव्हेंबर २०२३ रोजी झालेल्या विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात राहुलने अर्धशतकासाठी शंभराहून अधिक चेंडू खेळले होते.

आघाडीच्या चार फलंदाजांमध्ये एक डावखुरा फलंदाज असावा या दृष्टीने यशस्वी जैस्वाल याला वनडे संघात स्थान देण्याचे संकेत मिळाले आहेत. ऋषभ पंत यष्टिरक्षणासाठी पहिली पसंत असेल, तर राहुलला बॅकअप ठेवण्यात अर्थ नाही. राहुल यष्टिरक्षण करणार नसेल तर केवळ फलंदाज म्हणून संघात स्थान मिळणार नाही. इशान किशनने विजय हजारे करंडकात धावा काढल्या नाहीत. संजू सॅमसन याला सुरुवातीच्या सामन्यातून बाहेर राहिल्यानंतर केरळने त्याला नंतरच्या सामन्यासाठी निवडले नव्हते. गौतम गंभीरचे वजन कायम असल्यास सॅमसन पसंतीचा खेळाडू म्हणून संघात दिसू शकेल.

भारताला चॅम्पियन्स ट्रॉफीतील आपले सामने दुबईत खेळायचे आहेत. बांगलादेशविरुद्ध पहिला सामना २० फेब्रुवारीला असेल. भारताने सुरक्षेच्या कारणास्तव पाकमध्ये खेळण्यास नकार दिला आहे. पांढऱ्या चेंडूवर जडेजा तितका प्रभावी वाटत नाही. निवड समिती अक्षर पटेलला उत्कृष्ट पर्याय मानते. वॉशिंग्टन सुंदरची निवडदेखील निश्चित मानली जाते, मात्र कुलदीप यादवच्या फिटनेसकडे लक्ष असेल. कुलदीप नसेल, तर रवी बिश्नोई किंवा वरुण चक्रवर्ती यांना संधी असेल.

वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीच्या तंदुरुस्तीविषयी निवड समितीकडे स्पष्ट माहिती उपलब्ध नाही. विजय हजारे चषक स्पर्धेच्या दोन सामन्यांत त्याने गोलंदाजी केली. जसप्रीत बुमराह पाठदुखीमुळे स्पर्धेला मुकल्यास शमीचा अनुभवी संघासाठी हितावह ठरणार आहे. राखीव फलंदाज रिंकू सिंग आणि तिलक वर्मा हेदेखील चांगले पर्याय आहेत.

## ‘किवी’ खेळाडूकडून सूर्यकुमारसारखा झेल

**ऑकलंड :** सूर्यकुमार यादवने अशक्यप्राय झेल घेऊन टीम इंडियाला २०२४चा टी-२० विश्वचषक जिंकून देण्यात महत्त्वाचे योगदान दिले. आता न्यूझीलंडच्या मॅट हेन्रीने सूर्यकुमार यादवसारखाच झेल घेत टी-२० विश्वचषक फायनलच्या आठवणी ताज्या केल्या.

न्यूझीलंड आणि श्रीलंका यांच्यातील तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेतील तिसरा आणि अंतिम सामना ईडन पार्कवर खेळला गेला. पाहुण्या संघाने हा सामना १४० धावांनी जिंकला. या सामन्यात श्रीलंकेने न्यूझीलंडला २९१ धावांचे लक्ष्य दिले होते. प्रत्युत्तरात यजमान संघ १५० धावातच गारद झाला, मात्र न्यूझीलंडने याआधीच सलग पहिले दोन एकदिवसीय सामने जिंकून मालिका जिंकली होती, पण तिसऱ्या वनडेत श्रीलंकेने यजमानांचा धुव्वा उडवत मालिकेचा शेवट गोड केला.


**श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ**
पुरस्कृत
**अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद**
पनवेल शाखा आणि
**चांगू काना ठाकूर महाविद्यालय, न्यू पनवेल (स्वायत्त)**
**(नॅक पुनर्मूल्यांकनात "A++" श्रेणी प्राप्त)**
यांच्या संयुक्त विद्यमाने
आयोजित

राज्यस्तरीय
अटल करंडक
एकांकिका स्पर्धा
वर्ष ११ वे
गौरव रंगभूमीचा..!

**महाअंतिम फेरी**
रंगमंच आमचा कलाविष्कार तुमचा...
दिनांक : १०, ११ व १२ जानेवारी २०२५
स्थळ : आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल.

**रविवार, १२ जानेवारी २०२५**

| क्र | संस्थेचे नाव | एकांकिकेचे नाव | वेळ |
|---|---|---|---|
| १ | रंगशाळा, जळगाव | गोंद्या आणि कमुचा फार्स | सकाळी ९:०० |
| २ | उगवाई कलारंग फोंडाघाट, कणकवली | जापसाल | सकाळी १०:१५ |
| ३ | सिडेनहॅम कॉलेज, मुंबई | आविघ्नेया | सकाळी ११:३० |
| ४ | कलादर्शन व नाट्यश्रृंगार, पुणे | बॉइल्ड - शुद्ध शाकाहारी | दुपारी १२:४५ |
| ५ | फितूर थिएटर सोसायटी, संत झेवियर कॉलेज, मुंबई | बॉडी ऑफ नरेवाडी | दुपारी ०२:०० |
| ६ | एकदम कडक नाट्यसंस्था, मुंबई | पाटी | दुपारी ०३:१५ |
| ७ | सी. के. ठाकूर (स्वायत्त) महाविद्यालय, पनवेल | वेदना सातारकर हजर सर | दुपारी ०४:३० |

**पारितोषिक वितरण समारंभ**

सप्रेम नमस्कार

श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा आणि चांगू काना ठाकूर स्वायत्त महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित **अटल करंडक** राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेची महाअंतिम फेरी दि. १०, ११, १२ जानेवारी २०२५ रोजी पार पडणार असून, १२ तारखेला सायंकाळी ७ वा. पारितोषिक समारंभ संपन्न होईल. त्या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान **मा. श्री. रामशेठजी ठाकूर** (माजी खासदार व चेअरमन, जनार्दन भगत शि. प्र. संस्था) हे भूषविणार आहेत. गौरव रंगभूमी पुरस्काराचे मानकरी **श्री. सतीश पुळेकर** (जेष्ठ कलावंत, रंगकर्मी) तसेच कार्यक्रमाप्रसंगी सन्माननीय उपस्थिती म्हणून **मा. श्री. मंगेश चितळे** (आयुक्त पनवेल म.न.पा.) व **मा. अविनाश कोळी** (जिल्हाध्यक्ष, भाजपा उ. रायगड) हे उपस्थित राहणार आहेत, कृपया आपण या प्रसंगी उपस्थित राहून उदयोन्मुख कलाकारांना प्रोत्साहित करावे.

**आदरणीय उपस्थिती**

**सुकन्या मोने** सुप्रसिद्ध अभिनेत्री
**देवेंद्र पेम** सुप्रसिद्ध दिगदर्शक
**विराजस कुलकर्णी** सुप्रसिद्ध अभिनेता/लेखक/दिगदर्शक
**जयवंत वाडकर** सुप्रसिद्ध अभिनेता
**कल्पना कोठारी** सुप्रसिद्ध नाट्य निर्मात्या
अटल करंडक ब्रँड अँबेसिडर **रुचिरा जाधव** सुप्रसिद्ध अभिनेत्री
**भरत सावले** सुप्रसिद्ध अभिनेता

**आपले स्नेहांकित**

**अरुणशेठ भगत** उपाध्यक्ष, श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल
**एस. के. पाटील** स्पर्धा सचिव व प्राचार्य चांगू काना ठाकूर महाविद्यालय न्यू पनवेल
**परेश ठाकूर** मा. सभागृह नेता (प.म.पा.) स्पर्धा प्रमुख, अटल करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा
**प्रशांत ठाकूर** आमदार व अध्यक्ष, अ. भा. म. नाट्यपरिषद पनवेल शास्वा

**टीम अटल करंडक**
चिन्मय समेळ • अभिषेक पटवर्धन • गणेश जगताप • अमोल खेर • शामनाथ पुंडे

TIPL : मुख्य प्रायोजक :
NEEL GROUP : सहप्रायोजक :
पनवेल महानगरपालिका : स्थळ प्रायोजक :
TRP : सोशल मिडीया पार्टनर : :
जय महाराष्ट्र : मिडीया पार्टनर :


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com